


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०७२ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

## थोडक्यात...

### अवकाळी पावसाचा थेट इशारा

मुंबई (समर्थ गांवकरी) : राज्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात मोठ्या प्रमाणात चढउतार बघायला मिळतोय. कधी थंडी, पाऊस तर उकाडा अशी स्थिती आहे. नोव्हेंबर महिन्यापर्यंत राज्यात पाऊस होता. डिसेंबरमध्ये थंडी दाखल झाली आणि जानेवारी महिन्यात तापमानात बदल होत आहे. सुरुवातीला सांगितले गेले की, डिसेंबर महिन्याप्रमाणेच जानेवारीतही राज्यात थंडी कायम राहिल. मात्र, जानेवारी महिना संपत आला असून तापमानात चढउतार बघायला मिळतोय. सध्या परिस्थितीला उत्तरेकडे कडाक्याची थंडी आहे. मात्र, त्या तुलनेत राज्यात थंडी नाही. उत्तरेकडे थंडी वाढली की, राज्यातही थंडी असते. पण यावेळी चित्र काही वेगळे बघायला मिळतंय. पंजाब, उत्तर प्रदेश, दिल्ली, हरियाणा, जम्मू काश्मीर या भागात पावसाचा इशारा देण्यात आला. शिवाय कडाक्याची थंडीही तिकडे आहे. राज्यातील वातावरणात गेल्या पंधरा दिवसांपासून मोठा बदल दिसतोय.

### काळीज चिरणाऱ्या शब्दाने सर्वच हादरले

मुंबई (समर्थ गांवकरी) : अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले आहे, या अपघातात एअर होस्टेस पिंकी माळी यांचेही निधन झाले होते. पिंकी माळी यांच्या पार्थिवावर काल वरळीत अंत्यसंस्कार करण्यात आले. आज मंत्री छगन भुजबळ यांनी पिंकी माळी यांच्या वरळी इथल्या राहत्या घरी कुटुंबियांची भेट घेतली. यावेळी त्यांनी पिंकी माळी यांच्या कुटुंबियांना पाच लाख रुपये वैयक्तिक मदत केली आहे. तसेच आजच मुख्यमंत्र्यांकडे सरकारच्या वतीने कुटुंबाला मदत करण्यासाठी सांगितलं जाणार आहे अशी माहिती दिली. एका बाजूला राजकारण तापलेलं असतानाच, एका भीषण अपघाताने माळी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. एअर होस्टेस पिंकी माळी, जिने आपल्या स्वप्नांना गवसणी घातली होती, ती आज आपल्यात नाही. नशिबाचे खेळ कधी कसे फिरतील याचा नेम नसतो. पिंकीचे वडील शिवकुमार माळी यांच्यासाठी तो दिवस एखाद्या काळरात्रीसारखाच ठरला. सकाळी त्यांना मित्राचा फोन आला, बातमी होती की 'अजितदादा गेले'. राजकारणातल्या घडामोडी समजून शिवकुमार यांनी विचारलं, ते कोणत्या पक्षात गेले? पण समोरून उत्तर आलं, टीव्ही लाव... अपघातात मृत्यू झालाय!

## शपथविधीबद्दल माहिती नाही : तो त्यांच्या पक्षाचा अंतर्गत निर्णय

### राष्ट्रवादीने काय करावे हा त्यांचा निर्णय - शरद पवार

पुणे : (समर्थ गांवकरी)



सुनेत्रा पवार यांच्याबद्दल जो निर्णय घेण्यात आला तो त्यांच्या पक्षाचा अंतर्गत निर्णय आहे. प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे हे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षाचे नेते आहेत त्यांनी काय करावे हा त्यांचा निर्णय आहे. त्यावर मी काही भाष्य करणार नाही, असे खासदार शरद पवार यांनी म्हटले आहे.

शरद पवार म्हणाले की, सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीबद्दल इतकी घाई मी केलेली नाही. सुनेत्रा पवारांशी माझी काहीही चर्चा झालेली नाही. अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यामध्ये विलीनीकरणाबद्दल चर्चा झाली होती. याबद्दल संपूर्ण जबाबदारी अजित पवारांकडे होती. पण या सर्व गोष्टीमध्ये आता खंड पडला आहे. अजित पवार यांच्या एकत्रीकरणाची इच्छा पूर्ण व्हावी ही आमची इच्छा आहे.

शरद पवार म्हणाले की, अजित पवार यांच्या एकत्रीकरणाची इच्छा पूर्ण व्हावी ही आमची इच्छा आहे. गेल्या 4 महिन्यापासून ही चर्चा सुरू होती, आता कोण चर्चा करणार हे ठरेल. दोन्ही पक्षामध्ये संवाद रहावा यासाठी आम्ही सकारात्मक होतो. विलीनीकरणाबद्दल निर्णय 12 तारखेला जाहीर करणार होते, त्या चर्चेत मी नव्हतो पण जयंत पाटील आणि अजित पवारांचे बोलणं झाले होते.

### जयंत पाटील चर्चा करतील

शरद पवार म्हणाले की, दोन्ही पक्ष एकत्र येतील का नाही याबद्दल आताच काही सांगता येत नाही. पण अजित पवारांची दोन्ही पक्ष एकत्र यावे ही इच्छा पूर्ण व्हावी ही आमची इच्छा आहे. अपघात हा अपघात त्यावर काय बोलणार. दोन्ही पक्ष एकत्र येण्याबाबत अजित पवार - जयंत पाटील हे चर्चा करत होते आता जयंत पाटील आणि ही मंडळी पुढे काय करायचे हे ठरवतील. आम्ही भाजपसोबत जाण्याचा काय संबंध आहे. आमची चर्चा ही पक्षासंदर्भात सुरू होती.

# सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री होणार

- महाराष्ट्राच्या पहिल्या महिला:पद स्वीकारण्यास होकार, आजच शपथविधी होण्याची शक्यता

### राष्ट्रवादीच्या निर्णयाला आमचा पाठिंबा - देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कुठलाही निर्णय जो काही घ्यायचा असेल तो राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष घेईल. त्यांनी घेतलेल्या निर्णयाला आमचा पाठिंबा असेल. पवार कुटुंब असेल किंवा पक्ष असेल आम्ही त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत. माझ्यासोबत दोनवेळा चर्चा करून राष्ट्रवादीचे नेते गेले आहेत. परंतु, त्यांचा जो निर्णय होईल त्यावर मी बोलणे योग्य नाही. अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाची आज 11 वाजता महत्त्वाची बैठक पार पडणार आहे. या बैठकीत पक्षाध्यक्ष पदावर कोण असणार यावर देखील निर्णय घेतला जाणार आहे. सुनेत्रा पवारच पक्षाच्या अध्यक्षा असाव्यात, अशी लोकांची भावना आहे. त्यानुसारच पक्ष निर्णय घेईल, असे बोलले जात आहे. दरम्यान, पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांचे देखील पक्षाध्यक्ष पदासाठी नाव चर्चेत असल्याचे समजते.

मुंबई : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर उपमुख्यमंत्री पदावर कोण बसणार, अशी चर्चा सुरू झाली असून यात सुनेत्रा पवारांच्या नावावरच शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, सुनेत्रा पवारांनी उपमुख्यमंत्री पद स्वीकारण्यास होकार दिला असल्याचे समजते. तसेच आजच सायंकाळी 5 वाजता शपथविधी देखील पार पडणार असल्याची माहिती समोर येत आहे. त्यानुसार सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार हे मुंबईकडे रवाना झाले आहेत.

अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील भेट घेतली होती. त्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) पक्षाची शनिवारी दुपारी 2 वाजता महत्त्वाची बैठक होणार असून या बैठकीत उपमुख्यमंत्री पदासाठी सुनेत्रा पवारांच्या नावावर शिक्कामोर्तब होणार असल्याचे बोलले जात आहे. इतकेच नव्हे तर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा देखील सुनेत्रा पवारच असाव्यात यावर पक्षातील नेत्यांचे एकमत झाल्याची माहिती समोर आली आहे. तसेच पार्थ पवारांना राज्यसभेवर पाठवण्याची चर्चा सुरू असल्याचेही समजते.



आजच्या बैठकीत सगळ्यांचे एकमत झाले तर आजच शपथविधी होऊ शकतो, असे सूचक विधान छगन भुजबळ यांनी पत्रकारांशी बोलताना केले होते. त्यामुळे सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री होणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्या, तर त्या महाराष्ट्राच्या पहिल्या उपमुख्यमंत्री ठरतील. तसेच नरेश आरोरा हे सुनेत्रा पवारांचा निरोप घेऊन मुंबईकडे रवाना झाल्याचे देखील समोर आले आहे. राजकीय गोष्टींची चर्चा करण्यासाठी सुनेत्रा पवारांनी नरेश आरोरा यांना बारामती येथे बोलावले असल्याची माहिती आहे. त्यानुसार नरेश आरोरा आणि सुनेत्रा पवार यांच्यात चर्चा झाल्यानंतर त्यांचा निरोप घेऊन आरोरा मुंबईकडे रवाना झाले असल्याची माहिती समोर आली आहे.

पत्रकारांशी बोलताना छगन भुजबळ म्हणाले, लोकांची जी मागणी आहे ती रास्त आहे. सुनेत्रा ताईंकडे पक्ष प्रमुख पद देण्यात यावे. अनेक लोकांची अशी मागणी आहे आणि त्यात काही चूक आहे, असे मला वाटत नाही. पण शेवटी याबाबत जो काही निर्णय होणार आहे तो सीएलपीमध्ये होईल. भुजबळ यांना दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चेविषयी विचारले असता, त्यांनी याबाबत मला फारसे काही माहित नसल्याचे स्पष्ट केले आहे.

सुनील तटकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यासंदर्भात बोलताना म्हणाले, आज मी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली हे खरे आहे. सुनेत्रा वहिनी आणि कुटुंब धार्मिक विधीमध्ये आहेत. धार्मिक विधी झाल्यानंतर आम्ही सर्व चर्चा करणार आहोत. आणि त्यानंतर आम्ही ठरवू. जे काही जनतेच्या मनात आहे, कार्यकर्त्यांच्या मनात आहे त्यानुसार निर्णय घेऊ. आज आपण पाहत आहोत की संपूर्ण राज्य शोकात आहे. दादांचे सर्व पैलू संबंध महाराष्ट्राने अनुभवले आहेत. त्यातच आम्ही आहोत, असे तटकरे यांनी म्हटले आहे.

## अजित-शरद पवार यांच्या NCP चे एकीकरण निश्चित

- भाजपही सहमत:शरद पवार गटाचे 8 खासदार मोदी सरकारला पाठिंबा देतील, पक्षाच्या नियंत्रणावर ओढाताण

मुंबई : (समर्थ गांवकरी)



अजित पवार यांच्या निधनानंतर दोन मोठे प्रश्न आहेत. पहिला म्हणजे त्यांचा पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (NCP) कोण सांभाळणार आणि दुसरा म्हणजे तीन वर्षांपूर्वी वेगळे झालेले अजित पवार गट आणि शरद पवार गट आता पुन्हा एकत्र येतील का. दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर आहे - होय. सूत्रांनुसार, दोन्ही गटांच्या विलीनीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, अजित पवार यांनी स्वतः याचा रोडमॅप तयार केला होता. ते या मुद्द्यावर सातत्याने बैठका घेत होते. त्यांच्या निधनानंतरही दोनदा बैठका झाल्या आहेत. आता 9 फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर दोन्ही गटांच्या विलीनीकरणाची घोषणा होऊ शकते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शरद पवार आणि भाजप हायकमांड यावर सहमत आहेत. म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेस (NCP) महायुतीचा भाग राहील, यामुळे केंद्रात NDA ला शरद पवार गटाच्या 8 खासदारांची साथही मिळेल. पक्षाची कमान सांभाळण्यासाठी अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा यांना पुढे करण्यात आले आहे. मात्र, प्रफुल्ल पटेल यांच्या दाव्यामुळे काही प्रमाणात ओढाताण निर्माण होत आहे.

28 जानेवारी रोजी बारामती येथे झालेल्या विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले होते. ते नगर परिषदेच्या निवडणुकीमुळे जनसभा घेण्यासाठी बारामतीला जात होते.

NCP (शरद गट) मधील आमच्या सूत्रांनी दावा केला आहे की दोन्ही पक्षांनी विलीनीकरणाचा आराखडा तयार केला आहे. मात्र, अजित पवार यांच्या निधनानंतर परिस्थिती थोडी बदलली आहे. सूत्रांनी सांगितले, '28 जानेवारी रोजी अजित दादांचे निधन झाले. त्यांच्या निधनापूर्वीच दोन्ही गटांनी विलीनीकरणासाठी 9 फेब्रुवारीची तारीख निश्चित केली होती. आता काही गोष्टी बदलल्या आहेत, पण विलीनीकरण अजूनही निश्चित आहे.' 9 तारीखच का ठरवण्यात आली? सूत्रांनी यावर उत्तर दिले आहे, 'यामागे शरद पवारांचेच डोकं आहे. एक महिन्यापूर्वी माध्यमांमध्ये विलीनीकरणाची चर्चा सुरू झाली होती. शरद पवार आधी परिस्थितीचा अंदाज घेत होते. त्यांनी अशा बातम्या चालू दिल्या. प्रतिसाद चांगला आल्यावर त्यांनी चर्चा पुढे नेली.'

'5 फेब्रुवारी रोजी महाराष्ट्रातील 12 जिल्हा परिषदांच्या निवडणुका होणार आहेत. 7 फेब्रुवारी रोजी निकाल लागणार होता. रणनीती अशी होती की, आधी निवडणुका संपू द्याव्यात, कारण पुणे जिल्हा परिषद अजित पवारांचा बालेकिल्ला राहिला आहे. बैठकीत ठरले होते की, शरद गटाचे उमेदवारही अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या 'घड्याळ' या चिन्हावरच निवडणूक लढवतील. आता दोन्ही पवार एकत्र येत आहेत, असा संदेश दिला जाईल. त्यानंतरच घोषणा होईल. आता त्याआधीच परिस्थिती बदलली आहे.'

## घरासमोर खेळत असलेल्या चमुकल्यावर बिबट्याची झडप

सांगली : (समर्थ गांवकरी)




राज्यभरात गेल्या काही महिन्यांमध्ये बिबट्यानं नागरिकांवर हल्ला केल्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याचं दिसून आलं आहे. राज्यातील बहुतांश शहरी भागात बिबट्याचं हमखास दर्शन होत असून शहराकडे धाव घेतलेल्या बिबट्याचीगंभीर समस्या बनली आहे. अनेकदा बिबट्यानं नागरिकांवर हल्ला करत जीव घेतल्याच्या देखील घटना घडल्या आहे. अशातच सांगलीच्या शिराळा तालुक्यात देखील अशीच एक घटना घडली आहे. तालुक्याच्या बिऊर गावामध्ये बिबट्यानं एका चार वर्षीय मुलावर हल्ला केलाय. या हल्ल्यात या चिमुकल्या मुलाचा मृत्यू झाला आहे. या घटनेने परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये भीतीची लाट पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बिबट्याने घरासमोर खेळत असलेल्या मुलावर अचानक झडप घालून ओढत अर्धा ते पाऊण किलोमीटर नेलंय. बिबट्याच्या या सततच्या हल्ल्याच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं असून दुसरीकडे वन विभागावर देखील नागरिकांचा रोष बघायला मिळतोय. हि दुर्दैवी घटना घडल्यानंतर संतप्त नागरिकांनी वन विभागाच्या कार्यालयावर दगडफेक केलीय.

### जिल्हा परिषद निवडणुकीत मराठा आरक्षणाचा तडका!

## नवीन OBC निवडणुकीच्या मैदानात

मुंबई : (समर्थ गांवकरी)




राज्यातील जिल्हा परिषद निवडणुकीत यंदा ट्विस्ट आला आहे. जिल्हा परिषद निवडणुकीत डावपेच आखल्या जात आहेत. भाजपला रोखण्याचे मोठे आव्हान इतर पक्षांसमोर आहे. विधानसभेपासून महायुतीमधील भाजप आणि शिंदेसेनेचा झंझावत कमी झालेला नाही. त्यात भाजपने मोठी हनुमान उडी घेतली आहे. आता जिल्हा परिषद निवडणुकीतही भाजप मोठी खेळी करण्याच्या तयारीत आहे. त्यापूर्वी एक मोठी घडामोड समोर आली आहे. मराठा आरक्षण आंदोलनामुळे मराठवाड्यात नवीन ओबीसींची लाट आली आहे. आता हे नवीन ओबीसी निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. त्याचा आगामी राजकारणावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. मराठा आरक्षणासाठी झालेल्या राज्यव्यापी आंदोलनानंतर निर्माण झालेला सामाजिक बदल आता थेट जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत स्पष्टपणे दिसून येत आहे. १९६७ पूर्वीच्या कुणबी नोंदीच्या आधारे ओबीसी प्रमाणपत्र मिळालेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील तब्बल ७० नव ओबीसी उमेदवारांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत उमेदवारी दाखल करून नशीब आजमावले आहे. जिल्हा परिषदेत ओबीसीसाठी राखीव असलेल्या १७ जागांसाठी ३१, तर पंचायत समितीच्या २९ गणांसाठी ३९ नव ओबीसी उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.विशेष म्हणजे भाजप, शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (उबाठा), काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) या प्रमुख राष्ट्रीय व राज्यस्तरीय पक्षांनीही या नव ओबीसी उमेदवारांना संधी दिली आहे. राज्यभरात मराठा आरक्षणाचा मुद्दा लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये कळीचा ठरला होता.त्यानंतर न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने जुन्या नोंदींचा सखोल अभ्यास केला. ऑक्टोबर २०२३ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत राज्यातील १ हजार ८८४ गावांमधील नोंदी तपासण्यात आल्या. यामध्ये मराठवाड्यातील २ लाख ५६ हजार ५०५ व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. आरक्षण मिळालेल्यांपैकी अनेकांनी आता या सामाजिक बदलाचे राजकीय प्रतिनिधित्व करत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत सक्रिय सहभाग घेतला असून, याचा थेट परिणाम निवडणूक समीकरणांवर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



# पारदर्शक व निष्पक्ष निवडणुकीसाठी प्रशासन सतर्क : आरुण जराड

■ वैजापुर पंचायत समीती जिल्हा परीषद निवडणूक पारदर्शक कारण्यासाठी स्ट्रॉंग रूमची निवडणूक निर्णय अधिकारी आरुण जराड यांच्याकडून पाहणी



**वैजापुरः (समर्थ गांवकरी)**

वैजापुर पंचायत समीती जिल्हा परीषद निवडणूक प्रक्रिया पारदर्शक,निष्पक्ष व सुरळीत पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी आरुण जराड यांनी आज स्ट्रॉंग रूमची सविस्तर पाहणी केली. या पाहणीदरम्यान निवडणुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या ईव्हीएम,तसेच इतर महत्त्वाच्या मतदान साहित्याच्या सुरक्षिततेचा बारकाईने आढावा घेण्यात आला. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक पारदर्शक,शांततेत व कोणत्याही तांत्रिक अडचणीशिवाय पार पाडण्याच्या दृष्टीने निवडणूक प्रशासनाने तयारीला वेग दिला असून त्याच अनुषंगाने करुणा निकेतन शाळा वैजापुर येथे EVM (इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिन) संदर्भात सविस्तर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी आरूण जराड यांनी

सहाय्यक निवडणूक निर्णय आधिकारी तहसीलदार सुनिल सांवत यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणात मतदान अधिकारी, सहाय्यक मतदान अधिकारी,झोनल अधिकारी तसेच निवडणूक कामासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना EVM मशिनच्या कार्यपद्धतीबाबत सखोल माहिती देण्यात आली.

स्ट्रॉंग रूम परिसरातील सुरक्षा व्यवस्थेची तपासणी करताना सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत आहेत का, २४ तास पोलीस बंदोबस्त उपलब्ध आहे का,तसेच प्रवेश-निर्गमन व्यवस्था योग्य प्रकारे नियंत्रित केली आहे का,याची खात्री करण्यात आली. कोणत्याही प्रकारची त्रुटी राहू नये यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक राहावी, उमेदवार व नागरिकांचा विश्वास अबाधित राहावा यासाठी प्रत्येक टप्प्यावर दक्षता घेणे आवश्यक असल्याचे निवडणुक निर्णय आधिकारी यांनी यावेळी सांगितले.यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सुनिल सांवत बिघोत हेमंत ऊशीर पोलिस अधीक्षक निरिक्षक सर्व कर्मचारी हजर होते.

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोर पालन करूनच संपूर्ण प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या पाहणीमुळे वैजापुर पंचायत समीती जिल्हा परीषद निवडणुकीतील सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत झाली असून निवडणुक प्रक्रिया पारदर्शक,निष्पक्ष व लोकशाही मुल्यांना धरून पार पाडण्याच्या दृष्टीने निवडणूक निर्णय अधिकारी आरुण जराड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सुचना दिल्या. सीसीटीव्ही कॅमेरे व्हिडिओग्राफी याचं नियमितपणे निरिक्षण काटेकोर नियंत्रण ठेवण्याचे आदेश देण्यात आले. कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार,हलगर्जीपणा किंवा तक्रार उद्भवू नये यासाठी दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले.

प्रशिक्षणाला विनाकारण गैरहजर राहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई करून गुन्हे दाखल केले जातील, असा इशारा निवडणूक निर्णय अधिकारी अरुण जराड यांनी दिला आहे.

मतदान केंद्रांवर मतदारांना कोणताही त्रास होणार नाही,याची काळजी घेण्यासह दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सुचनाही देण्यात आल्या.तसेच आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही यासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी सतर्क राहावे,असेही स्पष्ट करण्यात आले.

निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक निर्णय पारदर्शक राहावा,सर्व राजकीय पक्ष व उमेदवारांना समान वागणूक मिळावी, यासाठी प्रशासनाने तटस्थ भूमिका राखावी, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी आरुण जराड यांनी केले. या सुचनांमुळे वैजापुर पंचायत समीती जिल्हा परीषद निवडणूक प्रक्रिया विश्वासार्ह आणि शांततेत पार पडेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

यावेळी एस जी रावते. ज्ञानोबा जायभाये, हेमंत ऊशिर मनिष दिवेकर,प्रदिप दुशिंग विष्णु बिरेवाड,ज्ञानेश्वर वाळुंज,आर डि साठे सचिन गायकवाड,प्रविण गायकवाड,नामदेव वसाळे,आमोल निखडे, नितीन महापुरे छायाचित्रकार शांताराम मगर यांच्यासह प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने ऊपस्थीत होते.

# पैसे दुप्पटच्या आमिषाने नऊ लाखांची फसवणूक

## नगर तालुक्यातील शेतकऱ्याची फिर्याद



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

पोस्ट ऑफिसमधील फिक्स डिपॉझिट व विविध बचत योजनांमध्ये गुंतवणूक केल्यास पैसे दुप्पट होतील, असे आमिष दाखवून कामरगाव (ता. अहिल्यानगर) येथील शेतकऱ्यासह गावातील ४० ते ५० नागरिकांची आर्थिक फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सुखदेव दगडू ठोकळ (वय- ५३, रा. कामरगाव) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. बबन साहेबराव शेलार (मुळ रा. गुंफा, भातकुडगाव, ता. शेवगाव, सध्या रा. फत्तेपुर, ता. नेवासा) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. बबन शेलार याने ६ जुलै २०२४ ते ७ जानेवारी २०२६ या कालावधीत कामरगाव पोस्ट ऑफिस येथे फिर्यादी सुखदेव ठोकळ व इतर नागरिकांचा विश्वास संपादन केला.

शेलार याने पोस्ट ऑफिसच्या खात्यामध्ये फिक्स डिपॉझिट व इतर योजनांमध्ये गुंतवणूक केल्यास रक्कम दुप्पट होईल, असे सांगून फिर्यादीकडून नऊ लाख रूपये घेतले. मात्र या रकमेच्या बदल्यात बनावट नोंदी करून विश्वासघात केला व आर्थिक फसवणूक केली, असे फिर्यादीत नमूद आहे.

सदर प्रकरणाची माहिती ठोकळ यांनी अहिल्यानगर तालुका पोलिसांना दिली. पोलिसांनी बुधवारी (२८ जानेवारी) सायंकाळी गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक पतंगे करीत आहेत.दरम्यान, संशयित आरोपीने आणखी किती नागरिकांची फसवणूक केली आहे, याचा तपास पोलीस करत आहेत. नागरिकांनी अशा आमिषांना बळी न पडता अधिकृत शासकीय योजनांची खातरजमा करूनच गुंतवणूक करावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# अजित दादा सोबत असलेले नात आणि संबंध आठवतो दिलीप धर्माधिकारी

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील बरबडा येथील दिलीप धर्माधिकारी यांना बातमी समजताच डोळ्यात अश्रू आले.विमान अपघातात राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या बाबत घडलेल्या दुर्दैवी विमान अपघाताच्या वृत्ताने नांदेड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस दिलीप धर्माधिकारी बरबडेकर यांना मोठा धक्का बसला असून, ही बातमी समजताच ते अतिशय भावनिक झाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फुट पडल्यानंतर नांदेड जिल्ह्याचे पहिले जिल्हाध्यक्ष म्हणून दिलीप धर्माधिकारी यांच्यावर अजीत दादा पवारांनी दाखवलेला विश्वास आजही त्यांच्या मनात ताजा आहे.

# जय मेहेरच्या जयघोषाने दुमदुमली बाबाची टेकडी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर येथील दौंड रोडवरील मेहराबाद (अरणगाव) मधील मेहेरबाबाच्या टेकडीवरील समाधी स्थळी ५७ वीअमरतिथी (पुण्यतिथी) सोहळा आजपासून प्रारंभ झाला आहे. त्या निमीत मोठ्या संख्रेने कालपासून भाविक येण्यास सुरवात झाली असून आज पहाटे पासूनचं समाधीचे दर्शन घेण्यास रांगा लागल्या आहेत सुमारे ८० हजाराच्या वर मेहेरप्रेमी भारतातून आले आहेत. दि १ फेब्रुवारी पर्यंत हा सोहळा होणार आहे. दर्शनासाठी टोकन पद्धत वापरली जाते त्यामुळे गडबड,गोंधळ होण्याचा संभव नसतो एका वेळेस पाचशे लोकांना टोकन दिले जाते त्याचा नंबर प्रमाणे दर्शनास सोडले जाते त्याची ही वेळ आधी सांगितली जाते.त्याप्रमाणे भाविक रांगेत उभे राहतात. त्याच्या साठी दर्शन रांग व त्यावरील मंडप ,पिण्याच्या पाण्याची व बसण्याची व्यवस्था ट्रस्टच्या वतीने करण्यात आली आहे.



नगर शहरापासून ६ की मी असेलेल्या मेहराबाद येथील टेकडी मेहेरप्रेमी जणांनी फुलून गेली आहे. अवतार मेहेरबाबा कि जय चा जयघोष ते करत आहे.सकाळी ११ वा बाबाच्या प्रतिमेचे पूजन करून विविध भाषेतून आरती प्रार्थना म्हणून अमरतिथीच्या सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली. कार्यक्रमासाठी चाळीस हजार भाविक बसतील असा भव्य मंडप आहे. मेहेरप्रेमी भजने,गजल, नृत्ये,कव्वाली,गाणे,नाटिका सादर करतील त्याच बरोबर बाबावरील फिल्म ही दाखवण्यात येतील.संपूर्ण तीन दिवसभर हा कार्यक्रम चालू राहणर आहे. एस टी ने येणाऱ्या भाविकांसाठी तीनही बसस्टेशन वरून मेहेराबादला बसेस सोडण्यात येत आहे.पोलिस बंदोबस्त मोठ्या प्रमाणावर आहे.अग्निशामक दल हि आहे, अनेक उपहारगृहे, प्रसादाची दुकाने,बाबाची फोटो, किचेन आदि विविध वस्तूची दुकाने मोठ्या प्रमाणात आहे. तर हजारो युवक,युवती स्वयसेवकाचे काम करत आहेत .

मेहेरबाबांचे असंख्य भक्त जगात असून असंख्य केंद्रेही आहेत.सर्व जाती धर्मातील लोकांना मानवतेचा व सत्याचा संदेश देत त्यांनी जगभर प्रवास केला जगात मी कोठेही देह सोडला तरी मेहेरावाद येथे बांधलेल्या समाधीत मला समाधीस्त करावे असे त्यांनी सांगून ठेवले होते ३१ जाने १९६९ रोजी त्यांचे महानिर्वाण झाले.म्हणून या ठिकाणी अमरतिथी सोहळयासाठी लाखो भाविक येत असतात.

# सावेडीत महिलांचा छळ; तरुणाविरोधात गुन्हा दाखल

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

सावेडी उपनगरातील निर्मलनगर परिसरात राहणाऱ्या एका तरूणाकडून महिलांना सातत्याने त्रास दिला जात असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. सूरज काळे (रा. निर्मलनगर, सावेडी) या तरुणाविरूध्द एका विवाहित महिलेने तोफखाना पोलिस ठाण्यात गुरूवारी (दि.२९) पहाटे फिर्याद दाखल केली असून, पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.



पीडित महिलेने फिर्यादीत म्हटले की, सुरज काळे हा गल्लीतून ये-जा करताना महिलांकडे अलिल नजरेने पाहणे, हातवारे करणे असे प्रकार सातत्याने करत आहे. याबाबत संबंधित महिलांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी त्याला तसेच त्याच्या घरच्यांना समज देऊनही त्याच्या वागण्यात कोणताही बदल झाला नाही. बुधवारी (दि.२८) रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास सुरज काळे याने टेम्पो थेट फिर्यादीच्या घरासमोर लावून जोरजोरात हॉर्न वाजवला. टेम्पोतील टेपचा आवाज वाढवून त्याने फिर्यादीचे नाव घेत बाहेर बोलावले. फिर्यादी व त्यांची बहीण बाहेर आल्यानंतर सुरजने अत्यंत लज्जास्पद शब्द वापरत जबरदस्तीने हात धरून लज्जास्पद वर्तन केल्याचा आरोप आहे. याचवेळी आरोपी सूरजने फिर्यादीच्या बहिणीशीही अंगलटपणा करत अलिल वक्तव्य केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. दोघींनी आरडाओरडा केल्यानंतर परिसरातील नागरिक जमा होताच सुरजने शिवीगाळ करीत, पोलीस तक्रार केली तर सोडणार नाही अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा तपास पोलिस अंमलदार दीपक गांगर्डे करीत आहेत. दरम्यान, या घटनेमुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण असून, परिसरातील नागरिकांनी सूरज काळे विरोधात कठोर कारवाईची मागणी केली आहे. आज कारवाई झाली नाही तर उद्या आणखी गंभीर घटना घडू शकते, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, संशयित आरोपी सूरज काळे याचा त्रास नवीन नसून यापूर्वीही त्याच्याविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली होती. मात्र, त्या वेळी ठोस कारवाई न झाल्यामुळे त्याचे धाडस वाढले आणि पुन्हा असा प्रकार घडल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. टेम्पोमधील टेपमध्ये मोठ्या आवाजात रात्री उशिरापर्यंत गाणे वाजविणे, दारू पिऊन गल्लीत शिवीगाळ करत गोंधळ घालणे असे प्रकार त्याच्याकडून दररोज सुरू असल्याने पोलिसांनी त्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

# स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त स्वातंत्र्य आंदोलनात बलिदान दिलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथे हुतात्मा दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने दोन मिनिटांचे मौन पाळून हुतात्म्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ३० जानेवारी हा दिवस 'हुतात्मा दिन' म्हणून साजरा करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य हुतात्म्यांच्या बलिदानाची आठवण म्हणून हा दिवस साजरा केला जातो. महात्मा गांधी यांच्या हत्येच्या घटनेचा निषेध व्यक्त करत हिंसक व विकृत प्रवृत्तीविरोधात दोन मिनिटांचे मौन पाळण्यात आले.

# महापालिकेत अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान

**नांदेडजिल्हा : (समर्थ गांवकरी)**

प्रजासत्ताक दिनाचा ध्वजारोहण कार्यक्रम पार पडल्यानंतर मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्या संकल्पनेतून महापालिकेत उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना Officer of the month व Employee of the month हा पुरस्कार देण्यात आला.



निवडणूक प्रक्रियेचे नियोजन व व्यवस्थापन चोख पद्धतीने केल्यामुळे माहे जानेवारी २०२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल Officer of the month हा पुरस्कार उपायुक्त श्री नितीन दशरथ गाढवे यांना आयुक्तांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, त्याचप्रमाणे माहे नोव्हेंबर २०२५ मध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल Officer of the month हा पुरस्कार सहाय्यक आयुक्त मनिषा शहाजी नरसाळे तसेच माहे डिसेंबर २०२५ साठी भांडारपाल श्री नागनाथ कानबाराव पतंगे यांना Officer of the month हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच आस्थापना विभागात केलेल्या उत्कृष्ट कामाची दखल घेऊन माहे सप्टेंबर २०२५ साठीचा Employee of the month हा पुरस्कार वरिष्ठ लिपिक श्रीरंग संभाजी पवळे यांना तर माहे ऑक्टोबर २०२५ साठी वरिष्ठ लिपिक सोमेश्वर गोविंदराव तांबोळी यांना घोषित करण्यात आला. त्याचप्रमाणे निवडणूक कामी विशेष कामगिरी बजावल्या बद्दल माहे नोव्हेंबर २०२५ साठी संयुक्तपणे कनिष्ठ अभियंता रविंद्र संभाजी सरपाते व लिपिक मो.अब्दुल अल्लम मो.इकबाल यांना तर अतिक्रमण विभागात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल माहे डिसेंबर २०२५ साठी संयुक्तपणे लिपिक अनिल गणपतराव चौदंते, लिपिक विशाल बालाजी सोनकांबळे व साप्रवि विभागातील आज्ञाधारक शिपाई सुजात अलीपिरसाब यांना तर माहे जानेवारी २०२६ साठी निवडणूक विभागातील वरिष्ठ लिपिक संतोष माणिकराव जोशी यांना Employee of the month म्हणून घोषित करून त्यांना आयुक्तांच्या हस्ते प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ त्यांचा प्रजासत्ताक दिनी सत्कार करण्यात आला.

# किनवट शोकसभा संपन्न




**किनवट : (समर्थ गांवकरी)**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने दि. २९ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता जिजामाता चौक, किनवट येथे शोकसभा आयोजित करण्यात आली होती. या शोकसभेचे आयोजन विधानसभा अध्यक्ष वैजनाथ करपुडे पाटील व तालुका अध्यक्ष बाळू पवार पाटील यांनी केले. शोकसभेत आमदार भीमराव केराम यांनी आपल्या पहिल्या आमदारकीच्या कार्यकाळातील अजितदादा पवार यांच्यासोबतच्या आठवणी, मागील ३५ वर्षांचा स्नेहसंबंध तसेच त्यांच्या निर्णयक्षम व शिस्तबद्ध कार्यशैलीविषयी भावनिक मनोगत व्यक्त केले.यावेळी भाजपा नेते सुधाकर भोयर, अशोक पाटील सूर्यवंशी, माजी नगराध्यक्ष ईसा खान व पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांनीही मनोगत व्यक्त करून अजितदादा पवार यांच्या राजकीय व सामाजिक कार्याचा गौरव केला.

# अवतार मेहेरबाबा सर्व धर्मियांचे श्रद्धास्थान, आज अमरतिथी

**अहिल्यानगरः (समर्थ गांवकरी)**

अवतार मेहेरबाबाची अमरतिथी नगरमधील मेहेराबाद येथे ३० जाणे ते १ फेबु पर्यंत मोठ्या उत्साहात साजरी होत आहे त्या निमित्ताने ३ दिवस कार्यक्रम होत आहे, हजारो मेहेरप्रेमी त्यानिमित्ताने नगर मध्ये येत आहेत. मेहरबाबा जगात फिरले पण त्यांनी अहमदनगरची भूमी निवडली व येथेच स्थिरावले, ते नगरजवळील वांबोरी रोडवरील पिंपळगाव माळवी येथील आश्रमात राहत असत तर त्याची समाधी अरणगाव येथे मेहेरबाद येथे आहे. या ठिकाणी सतत मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी व शांती साठी राज्यातून, भारतातून व जगातून येत असतात अशी माहिती त्यांच्या कार्या विषयी, त्याचा आध्यत्मिक विषयी माहिती नगर सेन्टरचे अध्यक्ष डॉ मेहेरनाथ कलचुरी यांनी दिली. नगर जिल्हा संतांचा जिल्हा आहे. या ठिकाणी अनेक अवतारी पुरुष,साधुसंत होवुन गेलेले आहेत. ज्यांनी सर्वधर्म एकच आहे हा संदेश दिला. असेच अवतार मेहेरबाबा अहमदनगर मध्ये होते. त्यांचे असंख्य भक्त आज भारतातच नव्हे तर परदेशात सुद्धा आहेत. तसेच असंख्य आश्रमही आहेत. अवतार मेहेरबाबा सर्व धर्मावर प्रेम, सर्व धर्माची पूजा करीत,परंतु आपण कोणत्याच धर्माचे नाही किंवा कोणता नवीन धर्म स्थापन करुन मानवाला मानवा पासुन वेगवेगळे करुन त्यांच्यात भ्रम वाढवु इच्छित नाही असे मेहेरबाबा म्हणत. मेहेरबाबांचा जन्म पुणे येथे २५ फेब्रुवारी१८९४ रोजी झाला.कॉलेजनंतर ते अध्यात्मिक क्षेत्राकडे वळले.



शिर्डीचे साईबाबा,शिर्डी जवळील साकुरीचे उपासनी महाराज,पुण्याचे हजरत बाबाजान,नागपूरचे ताजुद्दीन बाबा,दौंड जवळील केडगांव बेटचे नारायण महाराज हे त्यांचे अध्यात्मिक गुरु होते. सर्व जातीधर्मातील लोकांना मानवतेचा संदेश देत पुढे त्यांनी जगभर प्रवास केला.

१९२३ साली बाबा अहमदनगरला प्रथम आले होते. त्यांच्या अरणगांव (मेहेराबाद) येथील कुटीवर सर्व धर्माचे प्रतीक म्हणुन सात रंगाचा ध्वज लावण्यात आला. याच ठिकाणी त्यांनी १९२५ला धर्मार्थ दवाखाना व मोफत शाळा सुरु केली. बाबांनी१० जुलै १९२५ ते शेवटपर्यंत म्हणजे ३१ जानेवारी १९६९, असे ४४ वर्षे मौनव्रत पाळले. या काळात ते कोणाशीच बोलले नाही. यातच त्यांनी भारतात अनेक ठिकाणी व१३ वेळा अध्यात्म प्रचारासाठी जगप्रवास केला.

त्यांनी गॉडस स्पिक,लिसन ह्युमिनिटी, परफेक्ट मास्तर,अवतार आदी ग्रंथ लिहीले. जगात कोठेही माझे निधन झाले तरी माझी समाधी अरणगांव (मेहेराबाद) येथेच बांधावी असे बाबांनी आपल्या भक्तांना सांगुन ठेवले होते. हेच ठिकाण आता मेहेराबाद म्हणुन प्रसिद्ध आहे. शेवटचा काळ त्यांनी पिंपळगांव माळवी (मेहेराझाद) येथे घालविला. तेथेच त्यांचे३१ जानेवारी१९६९ रोजी महानिर्वाण झाले. नंतर त्यांची समाधी मेहेराबाद येथे बांधण्यात आली.

नगरमधील किंग्जरोडवर अवतार मेहेरबाबा ट्रस्टचे अवतार मेहेरबाबा केंद्र आहे. या ठिकाणाहुन सर्व कारभार पाहिला जातो. परदेशात ही बाबांचे अनेक आश्रम आहेत. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, ग्रेट ब्रिटन, इराण आदी ३० देशात ४०० केंद्र असुन भारतात अडीच हजार केंद्र आहेत.

जगातील सर्व केंद्रात एकमेकांना जय मेहेरबाबा म्हणुन ओळख दिली जाते. प्रत्येक केंद्रात दरवर्षी विविध उत्सव साजरे केले जातात. यामध्ये १० जुलै रोजी मौन सोहळा २४ तास पाळला जातो. १० जुलै १९२५ रोजी मेहेरबाबांनी मौनास प्रारंभ केला म्हणुन हा उत्सव केला जातो. १६ ऑक्टो.हा नविन जीवन सोहळा म्हणुन साजरा केला जातो. १६ ऑक्टो. १९४९ रोजी नविन जीवन म्हणुन बाबांनी दोन वर्षे पायी प्रवास केला. म्हणुन बाबाप्रेमी नगर ते मेहेराबाद पायी दिंडी काढतात. ३१ जाने. हा बाबांचा अमरतीथी सोहळा फक्त मेहेराबाद येथेच साजरा केला जातो.

# ठाण्याच्या महापौरपदी शिवसेनेच्या शर्मिला पिंपोळकर तर उपमहापौर पदी भाजपचे कृष्णा पाटील

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाण्याच्या महापौर पदासाठी अनेक नावांची चर्चा होती, मात्र कोपरी परिसरातील शिवसेना नगरसेविका शर्मिला पिंपोळकर यांचे नाव जवळपास निश्चित झाले आहे. महापौर पदाच्या रेसमध्ये वागळे मधून दर्शना जानकर तसेच वर्तकनगर मधून विमल भोईर, दिव्यातून दिपक जाधव यांच्या नावाचीही चर्चा होती. मात्र महापौर पदासाठी आज नामनिर्देशन दाखल करण्यात आले असून सौ. पिंपोळकर यांचे नाव निश्चित झाले आहे. तर दुसरीकडे भाजपने विरोधी पक्षात बसण्याचा निर्णय गुंडाळला असून सत्तेत सामील होत उपमहापौर पदी कृष्णा पाटील यांची वर्णी लावली आहे. त्यामुळे ठाणे महापालिकेत आता शिवसेनेचा



महापौर आणि भाजपचा उपमहापौर असे सत्तेचे समीकरण बनले आहे.

नुकत्याच झालेल्या ठाणे महापालिकेच्या निवडणुकीमध्ये शिंदेच्या शिवसेनेला पूर्ण बहुमत मिळाले आहे. शिवसेनेचे ७५ नगरसेवक निवडून आले असून भाजपचे २८ नगरसेवक निवडणून आले आहेत. त्यामुळे महापौर पदी शिवसेनेचाच महापौर बसणार हे निश्चित झाले होते. महापौर पदासाठी अनुसूचित जातीचे आरक्षण पडल्याने महापौर पदासाठी दर्शना जानकर, विमल भोईर, पद्मा भगत, दिपक जाधव आणि शर्मिला पिंपोळकर यांच्या नावाची चर्चा होती. मात्र आज महापौर पदासाठी नामनिर्देशन दाखल करण्यात आले. यामध्ये महापौर पदासाठी शर्मिला पिंपोळकर तर उपमहापौर पदासाठी भाजपच्या कृष्णा पाटील यांनी आपले नामनिर्देशन दाखल केले. यामध्ये शर्मिला पिंपोळकर यांचे नाव निश्चित करण्यात आले तर उपमहापौर पदासाठी कृष्णा पाटील यांची वर्णी लागली आहे.

ठाणे महापालिकेत योग्य पद मिळाले नाही तर विरोधात बसण्याची भूमिका घेणाऱ्या भाजपने आपला निर्णय बासनात गुंडाळला. ठाण्याच्या उपमहापौर पदी भाजपच्या कृष्णा पाटील यांची वर्णी लागली आहे. सत्तेत महत्वाचा वाटा मिळावा यासाठी महत्वाच्या समितीवर भाजपने मागणी केली आहे. यामध्ये स्थायी समिती, परिवहन समिती, शिक्षण मंडळ प्रभाग समितीमध्येही भाजप आजही आग्रही आहे. प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे मा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आमदार निरंजन डावखरे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, भाजप जिल्हाध्यक्ष संदीप लेले, भाजप गटनेते मुकेश मोकाशी यांची उपस्थिती होती.

# अकोले येथे अनोळखी इसमाचा अकस्मात मृत्यू; वारसांचा शोध सुरू!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले पोलीस ठाणे हद्दीत एका अंदाजे ३५ वर्षीय अनोळखी पुरुषाचा अकस्मात मृत्यू झाल्याची घटना समोर आली असून, मृत इसमाच्या वारसांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना तपासयादी पाठवली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी दुपारी सुमारे ३.१५ वाजण्याच्या सुमारास हा अनोळखी इसम अचानक चक्कर येऊन गटारीच्या पाण्यात बेशुद्ध अवस्थेत पडलेला आढळून आला. नागरिकांच्या मदतीने त्याला तात्काळ ग्रामीण रुग्णालय, कोतुळ (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) येथे उपचारासाठी नेण्यात आले. मात्र, कर्तव्यावरील डॉक्टरांनी तपासणी



करून औषधोपचारापूर्वीच त्यास मृत घोषित केले.

या प्रकरणी अकोले पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू रजिस्टर नंबर १०/२०२६, बी.एन.एस.एस. कलम १९४ अन्वये नोंद करण्यात आली आहे. सदर घटनेची खबर ग्रामीण रुग्णालय, कोतुळ येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पोलिसांना दिली आहे. मृत इसमाची ओळख अद्याप पटलेली नसून, त्याचे वय अंदाजे ३५ वर्षे असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. मृत इसमाचा फोटो पोलिसांकडून प्रसिद्ध करण्यात आला असून, या इसमाबाबत किंवा त्याच्या वारसांबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास अकोले पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी माहिती देण्यासाठी अकोले पोलीस ठाणे, फोन क्रमांक ०२४२४-२२१३३३ किंवा मोबाईल क्रमांक ९८२२७८२४५९ वर संपर्क साधावा, असे आवाहन पोहवा/३५४ शरद गोविंद पवार, अकोले पोलीस ठाणे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# भाग्योदय विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम व वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

आपला भारत देश जगातील एक मोठी लोकशाही असून आपल्या देशामध्ये नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी केली पाहिजे. समाजावर आधारित शैक्षणिक धोरणाची शिक्षण व्यवस्था आणण्यासाठी सर्व शाळा, कॉलेज व महाविद्यालयांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

शिक्षण व्यवस्थेतील चुकीच्या धोरणांमुळे भारतात सर्वाधिक सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढली आहे. हे प्रमाण कमी करण्यासाठी नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी झाली तरच आपण विकसित राष्ट्र बनू शकतो. यासाठी विद्यार्थ्यांनी नेहमी मोठी स्वप्ने पाहावीत. विद्यार्थी महत्त्वाकांक्षी असला पाहिजे तरच तो प्रगती करू शकतो आणि आपल्या क्षेत्रात आयकॉन बनला पाहिजे, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांनी केले.

भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी बोलत होते.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगन्नाथ भोर, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भानुदासजी कोतकर, संस्थेचे संचालक रघुनाथ लोंढे, प्रसाद आंधळे, सागर सातपुते, प्राचार्य ज्ञानदेव बेरड, रेणुका माता प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक बन्सी नरवडे, जयद्र खाकाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

# श्रीनिवास सोनी यांचे निधन

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**

मुदखेड शहरातील प्रतिष्ठित व्यापारी श्रीनिवास दगडुलाल सोनी यांचे उतर प्रदेश अयोध्या येथे देवदर्शनाला गेले असता त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने दिनांक ३० जानेवारी सकाळी नऊ वाजता निधन झाला आहे.मृत्यू समय वय ते ६६ वर्षाचे होते त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुलं दोन मुली नातवंड असा परिवार आहे. श्रीनिवास सोनी हे धार्मिक वृत्तीचे नागरिक म्हणून ओळखले जाते ते भारतातील देवदर्शनाला जात असताना त्यांच्यासोबत शहरातील अनेक भक्त सोबत घेऊन दर्शनासाठी घेऊन जाण्याची सवयी होती आता सुद्धा त्यांनी मुदखेड शहरातील २० भक्तासोबत लक्झरी ट्रॅव्हल्स बांधून देवदर्शन करण्यासाठी गेले होते.

# अपहरण केलेल्या ३ महिन्याच्या बालिकेचा शोध लावण्यास मुंब्रा पोलिसांना यश

**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

दि. २२/०१/२०२६ रोजी सायंकाळी ०६.०० वा. चे सुमारास डीसीबी बँकेच्या सामेरील खाडीमशिनकडे जाणा-या रस्त्यावर, मुंब्रा, ठाणे येथे फिर्यादी फरजाना मन्सुरी, वय २३ वर्षे, रा. ठि. रूम नं ७०२, अजमेरी हाईटस, कौसा, मुंब्रा, ठाणे हया त्यांच्या दोन्ही मुलींना कडेवर घेवुन रस्ता क्रॉस करत होती तर आफीया (वय ३ महीने) हीस अनोळखी महीलेने फिर्यादी "छोटी बच्ची को मेरे गोद मे देदो मैं भी सामने हि जा रही हू प्रसंगी आफीया हिस तिच्याकडे दिले असता आरोपी महिलेने मुलगी पळुन नेवुन अपहरण केले म्हणुन मुंब्रा पोलीस स्टेशन गुन्हा रजि. क्र. ८९/२०२६ बी एन एस १३७ (२) प्रमाणे दिनांक २२-०१-२०२६ रोजी दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यातील अपहरित मुलगी नामे आफिया वय०३ महिने हिचा शोध घेणे करिता तात्काळ ४ तपास



पथके तयार करून तपास चालू करण्यात आला. अपहरीत लहान मुलीचा शोध घेताना घटनास्थळ डीसीबी बँकेच्या समोरील रोडवरील सीसीटीव्ही फुटेज वरून अपहरण करणारी एक बुरखाधारी महिला असल्याचे निष्पन्न झाले. सदर महिला ही रिक्षामध्ये बसून मुंब्रा स्टेशन पर्यंत आलेली दिसत होती. त्यानंतर सदर महिलेच्या सारखी दिसणारी व बुरख्याच्या आत तिच्या हातात असलेल्या बाळाच्या पायातील सॉक्स एक दिड इंच बाहेर आलेला होत्या त्या आधारे महिलेचा शोध घेत असताना मुंब्रा ते वांगणी येथील प्रत्येक रेल्वे स्टेशन व आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता सदर महिला ही कोणत्याही रेल्वे स्टेशन वर उतरलेली दिसून येत नव्हती. सदर तपासामध्ये कोणता तरी तपासाचा धागा आपल्या हातून सुटत असल्याचे वाटत असल्याने गुन्हे शोध पथकाचे स. पो.नि सावंत व टिम तपास पथकातील कर्मचारी यांचे कौशल्यपूर्ण तपास व तांत्रिक तपास तसेच गुप्त बातमीदार यांच्या मदतीने त्या महिलेस तिचे घरातून तपासकामी ताब्यात घेतले.


त्या महिलेचे नाव नसरीन इकलाख शेख असल्याचे तपासात निष्पन्न झाले, त्यानंतर तिच्याकडे तपास केला असता तिने सदरचे बाळ हे अकोला जिल्ह्यातील खेटरी ता. पातुर येथे असल्याचे सांगितले. त्यानंतर लागलीच तपासात खेटरी गाव, जिल्हा अकोला येथे येऊन लहान बाळ व आरोपीत मोहम्मद मुजीब गुलाब वय -३१ वर्ष, रा. हाजी नगर खेटरी गाव व त्याची पत्नी खैरूणिसा मुजीब मोहम्मद, वय ३० वर्ष, रा. सदर यांना ताब्यात घेण्यात आले. सदर तपासामध्ये मुंब्रा ते सीएसएमटी, मुंबई व मुंब्रा ते टिटवाळा, दांगणी दरम्यानचे सुमारे १६०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून, गुप्त बातमीदार मार्फत तसेच तांत्रिक तपास करुन सहा दिवस तररोज १६ ते १८ तास अहोरात्र तपास करून सदर गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

# अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालय बॉम्बने उडवून देण्याची पुन्हा धमकी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्याचे प्रशासन केंद्र असलेल्या अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयाला पुन्हा एकदा बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्याने खळबळ उडाली आहे. आज दुपारी तीन वाजेच्या सुमारास कार्यालयाच्या अधिकृत मेलवर हा धमकीचा संदेश धडकला. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने सूत्रे हलवली असून, 'बॉम्ब शोधक व नाशक' पथकाकडून (BDDS) परिसराची कसून तपासणी सुरू आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही अशाच प्रकारे धमकी देण्यात आली होती. या वारंवार मिळणाऱ्या धमक्यांमुळे सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून पोलीस प्रशासनाने तपासाची चक्रे वेगवान केली आहेत.

मध्यप्रदेशातून सोलापूरच्या दिशेने गहू घेऊन जाणाऱ्या एका ट्रकला अहिल्यानगरजवळील देहरे टोल नाक्यावर अडवून चार चोरट्यांनी चाकूचा



धाक दाखवत लूट केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

चोरट्यांनी ट्रक चालकाचे हातपाय बांधून ट्रकमधील नऊ लाख ६७ हजार २०० रूपये किमतीचे गव्हाचे ९५३ कट्टे दुसऱ्या ट्रकमध्ये भरून लंपास केले आहेत. याप्रकरणी जगदीश चतुर्भुज माळी (वय ५५, रा. लहुजा, ता. सितामऊ, जि. मंदसौर, मध्यप्रदेश) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात बुधवारी (२८ जानेवारी) सायंकाळी फिर्याद दिली आहे. त्यावरून चार अनोळखीविरोधात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जगदीश माळी यांनी त्यांच्या ट्रकमध्ये निमज (मध्यप्रदेश) येथून गव्हाचे कट्टे भरले.

ते सोलापूर येथे खाली करण्यासाठी निघाले होते. मंगळवारी (२७ जानेवारी) रात्री ८.३० वाजेच्या सुमारास अहिल्यानगर- मनमाड रस्त्यावरील देहरे टोल नाक्याजवळ चार चोरट्यांनी त्यांचा १२ टायर ट्रक माळी यांच्या ट्रकसमोर आडवा लावला. त्यानंतर चोरट्यांनी माळी यांना चाकूचा धाक दाखवून धमकावले आणि त्यांचे हातपाय बांधून टाकले.

यानंतर चोरट्यांनी माळी यांच्या ट्रकमधील सात लाख ९९ हजार २०० रूपये किमतीचे ८३३ गव्हाचे कट्टे आणि एक लाख ६८ हजार रूपये किमतीचे १२० गव्हाचे कट्टे असा एकूण नऊ लाख ६७ हजार २०० रूपयांचा गहू स्वतःच्या ट्रकमध्ये भरून पोबारा केला. माळी यांनी या घटनेची माहिती एमआयडीसी पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता चोरटे पसार झाले होते. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून गुन्ह्याची नोंद केला आहे.

पोलीस उपनिरीक्षक मोढे या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत. भररस्त्यात झालेल्या या चोरीच्या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

# श्री विश्वकर्मा भगवान जयंती उत्सवाचे आयोजन

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

श्री विश्वकर्मा त्वष्टा पांचाळ समाज, अहिल्यानगर यांच्या वतीने यावर्षी श्री विश्वकर्मा भगवान जयंती उत्सव नव्याने उभारण्यात आलेल्या श्री विश्वकर्मा मंदिरामध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. हा उत्सव माघ शुद्ध १३, शनिवार दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता आयोजित करण्यात आला आहे.सकाळी १०.०० वाजता श्री विश्वकर्मा भगवान पूजन, सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत श्री सत्यनारायण महापूजा, दुपारी १.०० वाजता महाआरती व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमासाठी श्री क्षेत्र देवगड संस्थानचे महंत परम पूज्य गुरुवर्य ह. भ. प. भास्करगिरी महाराज यांचे आशीर्वाद लाभणार आहेत.

# सामूहिक विवाह सोहळ्यात ३१ जोडपी होणार विवाहबद्ध

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

यादव अहीर गवळी समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक सशक्तीकरणाचा आदर्श ठरणारा २५ वा आंतरराज्यीय स्वजातिय सामूहिक विवाह सोहळा येत्या २ व ३ फेब्रुवारी २०२६ रोजी नांदेड येथे अत्यंत भव्य स्वरूपात पार पडणार आहे. या ऐतिहासिक सोहळ्याच्या निमित्ताने नांदेड शहरात गवळी समाजबांधवांचा मोठा मेळावा भरत असून, संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या २५व्या सामूहिक विवाह सोहळ्यासाठी ३१ विवाह करण्याचे नियोजन निश्चित करण्यात आले होते. या उपक्रमाला विविध राज्यांमधून प्रचंड प्रतिसाद मिळाला आणि ठरल्याप्रमाणे नियोजित व्यवस्था, शिस्तबद्ध आयोजन आणि विवाह विधींची पारंपरिक पद्धत लक्षात घेता, ३१ वधू-वरांचे विवाह निश्चित वेळापत्रकानुसार पार पाडले.

**नावात बदल**

लग्नापुर्वीचे नाव –
**मंदाबाई दादू शिंदे**
लग्नानंतरचे नाव –
**सौ. मंदा विष्णू जगताप**
(वय ५३)
रा. धुमाळवाडी, ता. अकोले
जिल्हा अहिल्यानगर
(या दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच आहे)

**अगस्ति सहकारी सारवर कारखाना लि. अगस्तिनगर**

ता. अकोले, जि. अहमदनगर, फोन नं. (०२४२४) २९७१२६
ग्राम–अगस्तिसाखर, Email id - agastisakhar@rediffmail.com

**–: सी –हेवी ए ग्रेड मोलॅसेस विक्री टेंडर :–**

आमचे कारखान्याचे गळीत हंगाम सन २०२५–२६ मधील उत्पादित शिल्लक **सी हेवी ए ग्रेड मोलॅसेस** ४००० मे.टन विक्री करावयाचे आहे. तरी अधिकृत M-II परवानाधारक सी–हेवी ए ग्रेड मोलॅसेस खरेदीदारांनी दराबाबतच्या आपआपल्या सिलबंद निविदा दि. ०४/०२/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कारखान्याकडे समक्ष पाठवाव्यात. निविदेसोबत रु. १,००,०००/– (अक्षरी रु. एक लाख) रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेवरील डी.डी. देण्यात यावा. डी.डी. शिवाय प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. दराबाबत प्रत्यक्ष चर्चा करणेसाठी आपणास अलाहिदा कळविण्यात येईल. टेंडर मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार कारखाना व्यवस्थापनाचा राहील.

(सुधिर कापडणीस) कार्यकारी संचालक
(श्रीमती सुनिताताई भांगरे) व्हा. चेअरमन
(सिताराम पाटील गायकर) चेअरमन

# अकोलेतील हॉटेल संकेत बार अँड लॉजवर पोलिसांचा छापा

## वेश्याव्यवसाय प्रकरणी गुन्हा दाखल, एका महिलेची सुटका, मॅनेजर अटकेत!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले शहरातील शेकईवाडी परिसरात असलेल्या हॉटेल संकेत बार अँड लॉज येथे पोलिसांनी मोठी कारवाई करत वेश्याव्यवसाय चालवला जात असल्याचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत एका महिलेची सुटका करण्यात आली असून हॉटेल मॅनेजरला अटक करण्यात आली आहे. सदर कारवाईमुळे अकोले शहरात एकच खळबळ उडाली आहे.

यासंदर्भात अप्पर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर कार्यालयातून प्राप्त माहितीनुसार, दि. ३१ जानेवारी २०१९ रोजी सकाळी अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांना गोपनीय माहिती



मिळाली होती की, अकोले पोलीस स्टेशन हद्दीतील कोल्हार–घोटी रोडवरील शेकईवाडी येथे असलेल्या हॉटेल संकेत बार अँड लॉजमध्ये काही इसम स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी महिलांना पैशाचे आमिष दाखवून वेश्याव्यवसायासाठी प्रवृत्त करत असून लॉजिंगची सोय करून कुंटणखाना चालवत आहेत.

या खात्रीशीर माहितीनुसार अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोलीस हेड कॉन्स्टेबल दादासाहेब लोखंडे, पोलीस नाईक संदीप दरंदले, पोलीस कॉन्स्टेबल राजेंद्र बिनवडे व अशोक गाडे यांना कारवाईचे आदेश देण्यात आले. तसेच अकोले पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांची मदत घेऊन पथक रवाना करण्यात आले.

पोलिस पथक अकोले पोलीस स्टेशन येथे आल्यानंतर पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांना संपूर्ण माहिती देण्यात आली. त्यानंतर पंचवटी पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदारांना बोलावून संयुक्त कारवाई करण्यात आली. खात्री करण्यासाठी एका खाजगी इसमास बनावट ग्राहक म्हणून लॉजमध्ये पाठवण्यात आले. वेश्याव्यवसाय सुरू असल्याची खात्री झाल्यानंतर पंचासमक्ष हॉटेल संकेत बार अँड लॉजवर छापा टाकण्यात आला.

छाप्यादरम्यान लॉजच्या पहिल्या मजल्यावरील काउंटरवर असलेल्या इसमाकडे चौकशी केली असता त्याने आपले नाव सुनील शांताराम शिंदे (वय ४५, रा. शेकईवाडी असल्याचे सांगितले. तपासणीदरम्यान रूम क्रमांक दोनमध्ये एक महिला आढळून आली. चौकशीत सदर महिलेने हॉटेल मॅनेजरकडून वेश्याव्यवसाय करून घेतला जात असल्याचे व ग्राहकांकडून मिळालेल्या पैशातील काही हिस्सा मॅनेजरला दिला जात असल्याचे सांगितले. या व्यवसायातूनच आपली उपजीविका चालत असल्याची माहिती तिने पोलिसांना दिली.

पोलिसांनी तत्काळ त्या महिलेची सुटका केली. तसेच हॉटेल मॅनेजर सुनील शांताराम शिंदे यास अटक करण्यात आली. या प्रकरणी अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोलीस कॉन्स्टेबल अशोक शशिकांत गाडे यांच्या फिर्यादीवरून अकोले पोलीस स्टेशनला गुन्हा रजिस्टर नंबर ५३/२०१९ नुसार स्त्रिया व मुली यांच्या व्यापारास प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४ व ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात हॉटेल मालकासह इतर आणखी आरोपी सहभागी आहेत का, याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मोहन बोरसे करत आहेत. सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे (अहिल्यानगर), अप्पर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर सोमनाथ वाकचौरे व उपविभागीय पोलीस अधिकारी संगमनेर कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, सहाय्यक पोलीस निरीक्षक खांडबहाले यांच्यासह अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयातील व अकोले पोलीस स्टेशनमधील अनेक अधिकारी व अंमलदार सहभागी होते.

या धडक कारवाईनंतर अकोले शहर व परिसरात मोठी चर्चा सुरू असून, बेकायदेशीर व्यवसायांविरोधात पोलिसांचा कडक इशारा मानला जात आहे.

# वसमतच्या कृषी उत्पन्न बाजारात अश्रू, आठवणी आणि मौन

**वसमत : (समर्थ गांवकरी)**

वसमत शहरासाठी आजचा दिवस शोकमग्न ठरला. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री, कणखर नेतृत्वाचे प्रतीक आणि सामान्य जनतेचा आवाज असलेले अजित दादा पवार यांना कृषी उत्पन्न बाजार समिती वसमत येथे अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांतून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नेहमी गजबजलेली बाजारपेठ आज स्तब्ध झाली होती व्यापार थांबला होता, शब्द थांबले होते, फक्त आठवणी बोलत होत्या.



या श्रद्धांजली कार्यक्रमास वसमत विधानसभेचे लोकप्रिय आमदार राजू भैया नवघरे, बाळूमामा ढोरे, विनोद झंवर, माहागावकर, सभापती तानाजी बेडे, उपसभापती सचिन भोसले यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समितीतील सर्व आडते, व्यापारी व हमाल बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दुःख, डोळ्यांत अश्रू आणि मनात न भरून येणारी पोकळी स्पष्ट दिसत होती.

अजित दादा पवार म्हणजे फक्त एक राजकीय नेता नव्हता, तर शेतकरी, व्यापारी, कामगार आणि सामान्य माणसाचा आधार होता. बाजार समितीच्या साठी त्यांनी घेतलेले निर्णय, दिलेली आश्वासने आणि विकासासाठी केलेले प्रयत्न उपस्थितांच्या आठवणींतून पुन्हा जिवंत झाले.अनेकांच्या डोळ्यांतून नकळत अश्रू वाहत होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी अजित दादांच्या कणखर नेतृत्वाचा, स्पष्टवक्तेपणाचा आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी झटणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा भावनिक शब्दांत गौरव केला. "एकच वादा, आमचे अजित दादा" या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला आणि वातावरण अधिकच भारावून गेले.आज वसमतच्या बाजारात व्यवहार नव्हता, तर श्रद्धा होती. गर्दी नव्हती, तर शोक होता, आणि प्रत्येक मनात एकच भावना होती. अजित दादा, तुम्ही गेलात, पण तुमचा लढा, तुमची आठवण आणि तुमचं नेतृत्व कायम जिवंत राहील.



ठाणे : ठाणे महानगरपालिकेच्या दिवा प्रभाग समिती कार्यालयात देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ मौन पाळून आदरांजली वाहण्यात आली. प्रसंगी दिवा प्रभाग समितीच्या सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. ( फोटो - संतोष पडवळ )



आदित्य बिर्ला कॅपिटल लाइफ इन्शुरन्स एरिया हेड प्रभाकर सिंग यांना दैनिक समर्थ गावकरी २०२६ ची दिनदर्शिका आणि दैनिक समर्थ गावकरीची प्रत प्रदान करण्यात आली.



आदित्य बिर्ला कॅपिटल लाइफ इन्शुरन्स एजन्सी मॅनेजर सोनी कुमार यांना दैनिक समर्थ गावकरी २०२६ ची दिनदर्शिका तसेच दैनिक समर्थ गावकरीची प्रत प्रदान करण्यात आली.



पोलीस आयुक्तालय नवी मुंबई तुर्भे पोलीस ठाणे गोपनीय विभाग नवनाथ जाधव साहेब यांना दैनिक समर्थ गांवकरी २०२६ ची दिनदर्शिका आणि दैनिक समर्थ गांवकरी ची प्रत प्रदान आली.



पोलीस आयुक्तालय नवी मुंबई तुर्भे पोलीस ठाणे गोपनीय विभाग अरुण थोरात साहेब यांना दैनिक समर्थ गांवकरी २०२६ची दिनदर्शिका आणि दैनिक समर्थ गांवकरीची प्रत प्रदान आली

# स्त्रियांनी शारिरीक व मानसीकदृष्ट्या निर्भय झाले पाहिजे

■ केंद्रप्रमुख स्वाती अडाणे : ॲड.एम.एन. देशमुख महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान शिबीर संपन्न.

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

मुलींनी शारिरीक क्षमतेबरोबरच मानसिक व आर्थिक दृष्ट्या ही सक्षम व निर्भय व्हावयास हवे, दुसऱ्यावर अवलंबून राहणे हा स्त्रीशक्तीला शाप आहे, त्यामुळे सर्व स्त्रियांनी शारिरीक व मानसीक दृष्ट्या निर्भय झाले पाहिजे असे प्रतिपादन अकोले पंचायत समिती शिक्षण विभागाच्या राजूर-विठे केंद्राच्या केंद्रप्रमुख स्वाती अडाणे यांनी केले. त्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालय राजूर विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत निर्भय कन्या अभियान शिबिराच्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. त्यावेळी त्यांनी आधुनिक कालखंडातील स्त्रियांच्या कर्तुत्वाचे दाखले देऊन, कर्तुत्ववान स्त्रियांचा इतिहास, त्यांचे कार्य मुलीसमोर मांडले. मुलींनी स्वतःचे संरक्षण करण्याबरोबरच आपले कुटुंब, समाज यांचे संरक्षण केले तर समाज निकोप होईल.स्त्रियांसाठी अनेक कायदे आहेत, त्या



कायद्याचा आधार स्त्रियांनी घ्यावा असे मत राजूर पोलीस स्टेशनच्या महिला कॉन्स्टेबल सुवर्णा शिंदे-तांबे यांनी मांडले. राजूर पोलीस स्टेशनच्या वतीने महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनाच्या सप्ताहाच्या निमित्ताने राजूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी यावेळी उपस्थितांना शस्त्रांच्या बद्दल माहिती देऊन मार्गदर्शन केले. शिबिराच्या प्रथम सत्रात माननीय अमोल शेटे (कराटे गोल्ड मेडल विजेता) यांनी शिबिरार्थींना कराटे प्रशिक्षण दिले. या शिबिर प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. वाय. देशमुख यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्तविक विद्यार्थी विकास मंडळाचे प्रमुख डॉ. वाल्मिक गिते यांनी केले तर आभार डॉ. लहू काकडे यांनी मांडले. यावेळी श्रीमती सीमा कानवडे (विशेष शिक्षिका), महिला पोलीस कॉन्स्टेबल राहटळ मॅडम, प्रा. कुसमुडे सर, कै. ग. भा. गोदाबाई धोंगे नर्शिंग कॉलेजचे प्राचार्य सुदर्शन तांबे, उपप्राचार्य सौरभ जाधव व विलास लांघी हे ही उपस्थित होते. या शिबिरासाठी महाविद्यालयातील विद्यार्थिनी तसेच कै. ग. भा. गोदाबाई धोंगे नर्शिंग कॉलेज राजूर च्या प्रशिक्षनार्थी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

# श्रीगोंदा तालुक्यात लिंग गुणोत्तर चिंताजनक

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

■ मुलींच्या जन्मदरात मोठी घट

श्रीगोंदा तालुक्यात एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत नोंदवलेले जन्मदरातील लिंग गुणोत्तर अत्यंत चिंताजनक असल्याचे उघडकीस आले आहे. या कालावधीत तालुक्यात एकूण १,९२६ मुलांचा तर केवळ १,५९४ मुलींचा जन्म नोंदवण्यात आला असून, मुलींची संख्या मुलांच्या तुलनेत तब्बल ३३२ ने कमी आहे. या आकडेवारीनुसार तालुक्याचा लिंग गुणोत्तर दर केवळ ८२८ इतका असून, हा आकडा सामाजिकदृष्ट्या गंभीर आणि धोक्याची घंटा मानला जात आहे. नैसर्गिक लिंग गुणोत्तराच्या तुलनेत हा फरक लक्षणीय असल्याने भविष्यात सामाजिक असमतोल निर्माण होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. मुलींच्या जन्मदरात होत असलेली घट ही अत्यंत गंभीर बाब असून, यामागे समाजातील विकृत मानसिकता तसेच गर्भलिंग तपासणीसारख्या बेकायदेशीर प्रकारांवर अद्यापही प्रभावी नियंत्रण नसणे ही कारणे असल्याचे मत मांडले जात आहे. या पार्श्वभूमीवर 'बेटी बचाव, बेटी पढाव' यांसारख्या योजनांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज अधोरेखित केली जात आहे. दरम्यान, प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देत जनजागृती मोहिमा, वैद्यकीय तपासण्यांवर काटेकोर नियंत्रण तसेच दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी ठोस मागणी तालुक्यातील महिला व जागरूक नागरिकांकडून केली जात आहे.

# साईनाथ गॅस एजन्सीत महिलांसाठी विविध उपक्रम

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

भारत पेट्रोलियमच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने २४ जानेवारी २०२६ रोजी साईनाथ गॅस एजन्सी, पंतनगर, श्रीगोंदा येथे महिलांसाठी विविध सामाजिक व प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला सुमारे १५० ते २०० महिलांची उपस्थिती लाभली असून, यामध्ये ४० महिलांनी पाककला स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात कन्या विद्यालयाच्या प्राचार्या भोईटे मॅडम व भारतगॅसचे असिस्टंट एरिया सेल्स मॅनेजर श्री. राजकुमार मिश्रा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. प्रास्ताविकात भोईटे मॅडम यांनी उपस्थित महिलांना व मान्यवरांना सुवर्णमहोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना श्री. राजकुमार मिश्रा यांनी एलपीजी गॅसच्या सुरक्षित वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. गॅस सेफ्टीविषयी महिलांनी अधिक जागरूक राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

पाककला स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सी. मीनल भिंताडे, सौ. स्वाती देशमुख, सौ. भाग्यश्री मैड आणि सौ. पूजा खोसला यांनी काम पाहिले. तसेच सौ. पौर्णिमा श्रीकांत जवक व सी. प्रतीक्षा सुशांत जवक यांनी हळदी-कुंकू कार्यक्रमाचे सुंदर आयोजन केले.

स्पर्धेतील विजयी महिलांना आकर्षक बक्षिसांचे वितरण करण्यात आले. तीन प्रमुख बक्षिसांसह सर्व सहभागी स्पर्धकांना उत्तेजनार्थ भेटवस्तू व प्रमाणपत्रे देण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल साईनाथ गॅस एजन्सीचे वितरक श्रीकांत जयसिंग जवक व सुशांत जयसिंग जवक यांनी उपस्थित महिला, मान्यवर व प्रेक्षकांचे आभार मानले.

या कार्यक्रमास किशोर हिरणावळले, बाळासाहेब मोरे सर, अल्ताफ मुजावर, मनोज मैड, संतोष आमटे, दत्ताजी जगताप यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी साईनाथ गॅस एजन्सीच्या सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मला भावलेले अजितदादा



■ दिलीप अनुसया दत्तात्रय लांडगे ■

■ वरिष्ठ पोलीस निरीक्षक (सेवा निवृत्त) वडगांव लांडगा, ता. संगमनेर, अहिल्यानगर. ■



**डोंगरगाव : (समर्थ गांवकरी)**

राज्याचे सन्मा. ऊप मुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या विमान अपघातातील मृत्यूची बातमी आली आणि मन सुन्न झाले. क्षणात राज्यावर शोककळला पसरली. त्या बातमीवर विश्वास ठेवणे कठीण वाटत होते.नकळत डोळ्याच्या कडा पाणावल्या .राज्याने एक डॅशिंग,कार्यतत्पर उपमुख्यमंत्री गमावला.

माझ्या नोकरीच्या कार्यकाळात 2011 ते 2013 असे तीन वर्षे मला दादांचा वैयक्तिक सुरक्षा अधिकारी(PSO) या नात्याने दादांचा सहवास लाभला. दादा एक दिलखुलास, रोखठोक ,कडक शिस्तीचे, प्रशासनावर पकड असणारे,करारी बाण्याचे,वक्तशीर, कधीही न थकणारे,दिलेला शब्द पाळणारे,प्रसंगी विनोद शैलीत संवाद करणारे,

सर्वसामन्यांच्या प्रश्नांची जाण असणारे व ते प्रश्न तेवढ्याच तत्परतेने सोडवण्याची तळमळ असणारे, आपलेसे वाटणारे व्यक्तिमत्व.

सर्व सामान्यांच्या मनावर अधीराज्य करणारे खऱ्या अर्थाने ते सर्वांचे दादा होते.

दादा मुंबईला असताना न चुकता दर गुरुवारी सकाळी 7:00 वा. नरिमन पॉईंट येथिल पक्ष कार्यालयात जातीने हजर राहून राज्यभरातील अडीअडचणी , प्रश्न घेऊन येणारे नागरिकांना भेटून त्यांचे प्रश्न समजून घेत. त्यांची सामान्य माणसांचे प्रश्न सोडवण्याची एक खास शैली होती. तेथल्या तेथे,ताबडतोब संबधित अधिकारी यांचेशी बोलून प्रश्न मार्गी लावत असत.त्यांचेकडे येणारा प्रत्येक नागरिक समाधानी चेहऱ्याने बाहेर पडत असे. त्यामुळे ते सर्वांना आपलेसे वाटत असत.

शनिवार/रवीवारी ते पुणे / बारामती येथील नागरिकांना भेटून त्यांच्या समश्या सोडवत.

PSO या नात्याने दादांसोबत महाराष्ट्रभर अनेक दौरे करण्याचा योग्य आला. दौऱ्या दरम्यान आमची कोणतीही गैरसोय होणार नाही याची ते स्वतः काळजी घेत.दादांच्या पुणे(जिजाऊ)तसेच बारामती (काटेवाडी)येथील निवासस्थानी अनेकवेळा जाण्याचा योग्य आला. त्यांचे घरी त्यांचे सोबत जेवण करतांना आग्रह करणारे दादा अगदी मोठया भावसारखे वाटले. एकदा घाईघाईत दादा पुण्याहून हॅलोकॉप्टरने दौऱ्यावर निघाले. मी PSO म्हणून सोबत होतो .जेवणासाठी वेळ नसल्याने सोबत जेवणाचा टिफिन घेतला होता.त्या दिवशी दादांसोबत हेलिकॉप्टरमध्ये त्यांचे टिफीनमध्ये जेवण करण्याचा योग्य आला होता.

21 जून 2012 रोजी शॉर्टसर्किट मुळे मंत्रालयाला आग लागली होती.त्यावेळी अजित दादा मंत्रालयातील त्यांचे कार्यालयात कामकाजात व्यस्त होते.आगीची घटना त्यांना समजताच त्यांनी तात्काळ न डगमगता अनेकांना धीर देऊन तातडीने मदत कार्य आरंभ करून बचाव कार्याची सुत्रे स्वतःकडे घेतली त्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकले. दादांसोबत कर्तव्यावर असतांना त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू अगदी जवळून पाहण्याचा योग आला. महाराष्ट्राच्या राजकारणात व समाजकारणात असा दादा माणूस पुन्हा होणे नाही.!!!!

दादा आपल्या स्मृती महाराष्ट्राच्या चिरकाल स्मरणात राहीतील यात शंका नाही.

दादा आपल्यातून गेले यावर अजूनही विश्वास बसत नाही.

दादांना तसेच या विमान अपघातात आपले प्राण गमावलेल्या पायलट ,स्टाफ , PSO यांना भावपूर्ण आदरांजली.



प्रथम न्याय न्यूज चॅनेल आणी साप्ताहिक वृत्तवाहिनीचे संपादक सुभाष यादव साहेब यांना दैनिक समर्थ गांवकरी २०२६ ची दिनदर्शिका आणि दैनिक समर्थ गावकरीची प्रत प्रदान करण्यात आली.

# दिनेश फटांगरेवर सलग दुसरा गुन्हा दाखल

■ संपादक किसन भाऊ हासे यांची बदनामी केल्याप्रकरणी पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत संगमनेरमध्ये पहिला गुन्हा दाखल

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघातात निधनानंतर सत्ताधारी शिवसेना शिंदे गटाच्या विकृत माजी शहर प्रमुख दिनेश फटांगरे याने स्व. अजितदादांवर सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट टाकली. हा विकृत एव्हढ्यावरच थांबला नाही तर त्याने या घटनेची बातमी दैनिक युवावार्ताने प्रकाशित केल्याचा राग धरून त्याच्या फेसबुक पेजवर संपादक किसन भाऊ हासे यांच्यावर अतिशय खालच्या पातळीवर जाऊन अश्लील पोस्ट केली. त्याच्या या विकृती विरूद्ध दोन दिवसांपासून सर्व पक्षीय कार्यकर्ते संताप व्यक्त करीत आहेत. त्याचबरोबर त्याच्यावर सुरूवातीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने गुन्हा दाखल करण्यात झाला. तसेच वर्तमानपत्र व संपादकांची बदनामी करून धमकी दिल्याप्रकरणी पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत व बीएनएस नुसार विकृत दिनेश फटांगरेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पत्रकारांना धमकी व बदनामी केल्याप्रकरणी संगमनेर शहरात पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत पहिला गुन्हा दाखल झाला आहे. महाराष्ट्र प्रसार माध्यम व्यक्ती व प्रसारमाध्यम संस्था अधिनियम 2017 कलम 4 (पत्रकार संरक्षण कायदा), तसेच भारतीय न्याय संहिता 2023 मधील कलम 351, 352, 353(1), 356(1) अन्वये संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याने आपली विकृती कायम ठेवत विधानपरिषद आमदार सत्यजित तांबे यांच्यावर अतिशय खालच्या पातळीवर जाऊन गलिच्छ पोस्ट शेअर केली. त्याविषयी काँग्रेस पक्षाच्या वतीने गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. दोन दिवसांत तीन गुन्हे दाखल होत असलेला हा विकृत मात्र अजूनही फरार असल्याने सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे.

स्व. अजितदादांविषयी घडलेल्या घटनेची बातमी दैनिक युवावार्ताने प्रकाशित केली. त्या बातमीवर फटांगरे याने कमेंट करत अतिशय खालच्या पातळीवर टीका केली. त्याचबरोबर त्याच्या फेसबुक पेजवर संपादक किसन भाऊ हासे यांच्यावर वैयक्तिक स्वरूपाची अश्लील टीका करणारी पोस्ट केली. सर्व वर्तमान पत्रांप्रमाणेच दैनिक युवावार्तानेही या बातमीला कोणताही पूर्वग्रह न ठेवता प्रसिध्दी दिली. मात्र त्याने दैनिक युवावार्ता टार्गेट करत फेसबुक पेजवर संपादकांवर वैयक्तिक स्वरूपाची टीका करून समाजात वर्तमानपत्राची व संपादकांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला. याअगोदरही त्याने धमकीवजा अनेक अपमानास्पद पोस्ट केलेल्या आहेत. या सर्व कृत्य त्याने केवळ बातमीतून दुखावल्याने केले आहे. मागील एक वर्षापासून त्याचा हा विकृत प्रकार सुरू होता. ज्याची दखलही घ्यायची नाही, अशा प्रवृत्तीकडे दुर्लक्ष करत युवावार्ता परिवाराने अत्यंत संयमाने आपले कार्य सुरू ठेवले होते. मात्र दिनांक 29 जानेवारी 2026 रोजी या इसमाने अश्लीलतेचा कळस गाठला. त्यामुळे दिनांक 29 जानेवारी 2026 रोजी सर्व सामाजित संघटनांचे पदाधिकारी, पत्रकार व विविध पत्रकार संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसह पोलिस उपअधीक्षक कुणाल सोनवणे व शहर पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांच्यासमवेत चर्चा करून लेखी निवेदन दिले व आवश्यक पुरावे सादर केले. व्यक्तिगत पातळीवर करण्यात आलेली अश्लील, बदनामीकारक, धादांत खोटी टीका आम्ही कदापी सहन करणार नाही. दरम्यान दिनेश फटांगरे हा अतिशय विकृत इसम असून नशेच्या धुंदीत तो सोशल मीडियावर अनेक प्रतिष्ठित नागरिकांवर अतिशय खालच्या भाषेत पोस्ट टाकत असतो. या विकृत इसमावर शहर पोलिस ठाण्यात अनेक तक्रारी व गुन्हे दाखल आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

**राष्ट्रवादीत नेतृत्व, विलीनीकरण आणि सत्तेभोवती शह–काटशहाचे राजकारण!**

# सुनेत्रा पवारांचा तातडीचा शपथविधी का?





**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

(समर्थ गांवकरी)

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सध्या प्रचंड हालचाली सुरू असून अजित पवार गट आणि शरद पवार गट यांच्यातील सत्तासंघर्ष निर्णायक टप्प्यावर पोहोचल्याचे चित्र आहे. छगन भुजबळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुनेत्रा पवार यांचा लवकरात लवकर, कदाचित उद्याच राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाचा शपथविधी होण्याची दाट शक्यता आहे. विशेष म्हणजे, उपमुख्यमंत्री पदासोबतच अर्थमंत्री पदासाठी अजित पवारांकडे असलेले सर्व पक्षांतर्गत अधिकार सुनेत्रा पवारांकडे सोपवले जाणार असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

**मुख्यमंत्री फडणवीस भेट आणि सुनेत्रा पवारांवर शिक्कामोर्तब?**

आज सकाळी राष्ट्रवादीतील प्रमुख नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, धनंजय मुंडे आणि छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत सुनेत्रा पवार यांच्या नावावर सविस्तर चर्चा झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. या चर्चेनंतरच शपथविधीबाबतची घाई वाढल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे "इतकी घाई का?" हा प्रश्न उपस्थित होत असून, यामागे शह-काटशहाचे राजकारण असल्याचे जाणकारांचे मत आहे.

**विलीनीकरणाची चर्चा : वास्तव की राजकीय डावपेच?**

शरद पवार गटातील जयंत पाटील, राजेश टोपे, शशिकांत शिंदे, अंकुश काकडे यांसारखे नेते सातत्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची चर्चा पुढे आणत आहेत. "विलीनीकरण हीच अजित पवारांची शेवटची इच्छा होती," असा दावा हे नेते करत आहेत. मात्र, याला अजित पवार गटाकडून ठाम विरोध होत असून, "अजितदादांनी आम्हाला कधीच अशा विलीनीकरणाबाबत काही सांगितले नव्हते," असे या गटातील नेते स्पष्टपणे सांगत आहेत. विशेष म्हणजे, अजित पवार गटातील एकाही प्रमुख नेत्याने विलीनीकरणाची अधिकृत माहिती असल्याचे मान्य केलेले नाही.

**अजित पवार गटाची रणनीती काय?**

अजित पवार गटाच्या कार्यकारिणीत प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, धनंजय मुंडे, दिलीप वळसे पाटील आणि हसन मुश्रीफ हे प्रमुख नेते आहेत. यापैकी भुजबळ आणि धनंजय मुंडे हे काही काळ राजकारणाच्या केंद्रबिंदूपासून दूर गेले होते. भुजबळ यांना सुरुवातीला मंत्रीमंडळात स्थान मिळाले नव्हते, तर धनंजय मुंडे यांना कराड प्रकरणानंतर राजीनामा द्यावा लागला होता. त्यानंतरही अजित पवारांनी त्यांना पुन्हा मंत्रीमंडळात संधी दिली नव्हती.

मात्र, आता हेच नेते पुन्हा अग्रभागी येत सुनेत्रा पवार यांच्या नावासाठी आग्रही भूमिका घेताना दिसत आहेत. दुसरीकडे, सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल हे नेते अजित पवारांचे विश्वासू मानले जातात. शरद पवारांच्या विरोधात उभे राहिल्यानंतर त्यांचे महत्त्व वाढले होते आणि अजित पवार हयात असताना ते कायम होते. अजित पवारांच्या पश्चात पक्षाचे नेतृत्व पुन्हा शरद पवार किंवा सुप्रिया सुळे यांच्याकडे जाईल, ही भीती या नेत्यांच्या मनात असल्याचे बोलले जात आहे.

**शरद पवार गटाची भूमिका : आधी विलीनीकरण, मग उत्तराधिकारी!**

शरद पवार गटाची भूमिका मात्र वेगळी आहे. त्यांच्या मते, अजित पवारांच्या उत्तराधिकारीचा निर्णय तातडीने घेण्याऐवजी आधी राष्ट्रवादी काँग्रेसचे विलीनीकरण व्हावे. त्यानंतरच नेतृत्वाचा प्रश्न चर्चेत यावा. यामागे सुप्रिया सुळे यांना पक्षाच्या अध्यक्षपदी आणि राज्याच्या नेतृत्वात पुढे आणण्याचे राजकारण असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. सुनेत्रा पवार यांच्या नावाला थेट विरोध करता येत नसल्याने, त्यांच्या प्रशासकीय अनुभवावर आणि अर्थमंत्री व उपमुख्यमंत्री पदाची धुरा पेलण्याच्या क्षमतेवर प्रश्न उपस्थित केले जात असल्याची चर्चा आहे.

**कुटुंबीय दबाव आणि भावनिक राजकारण :** अजित पवार गटाच्या कार्यकारिणीतील एका प्रमुख नेत्याच्या माहितीनुसार, पवार कुटुंबातील भावनिक दबावाचा वापर करून विलीनीकरण घडवून आणण्याचा प्रयत्न होऊ शकतो. मात्र, याच शक्यतेमुळे अजित पवार गटाची कार्यकारिणी अधिक आक्रमक होताना दिसत आहे. "पुन्हा शरद पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे वर्चस्व नको," हीच भूमिका घेऊन हे नेते पुढे सरसावले आहेत.

एकीकडे विलीनीकरणाचा आग्रह आणि भावनिक आवाहन, तर दुसरीकडे सत्तेवर पकड कायम ठेवण्यासाठीची धडपड – राष्ट्रवादी काँग्रेसमधील हा संघर्ष पुढील काही दिवसांत निर्णायक वळण घेण्याची शक्यता आहे. सुनेत्रा पवारांचा शपथविधी झाला, तर तो केवळ एक पदग्रहण नसून महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या पर्वाची सुरुवात ठरेल, हे मात्र निश्चित.

## निर्णायक ठरणार आमदारांचा पाठिंबा

या संपूर्ण राजकीय संघर्षात निर्णायक ठरणार आहे तो आमदारांचा पाठिंबा. अजित पवार गटातील बहुतांश आमदार अजित पवारांशी एकनिष्ठ राहिले आहेत. त्यामुळे नेतृत्व अजित पवारांच्या कुटुंबातच जावे, या विचाराकडे ते झुकलेले आहेत. याच कारणामुळे सुनेत्रा पवार यांचा उपमुख्यमंत्री म्हणून उदय होण्याची शक्यता अधिक बळावली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या निर्णयाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा देखील अप्रत्यक्ष पाठिंबा मिळाल्याचे बोलले जात आहे.

# रोहयो योजनेला लागली टक्केवारीची मोठी कीड

- एक मस्टर काढण्यास १७ टक्के खर्च, लाभार्थ्यांची पिळवणूक

**बिलोली : (समर्थ गांवकरी)**

बिलोली तालुक्यातील रोजगार हमी योजने मार्फत करण्यात येत असलेल्या विविध सार्वजनिक कामासह शेतकऱ्यांच्या वैयक्तिक कामात रोहयो विभागातील संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांचा टक्केवारीचा मोठा वाटा असून काम केलेले कुशल मस्टरचे बिल काढण्यासाठी एका मस्टरला १७ टक्के खर्च करावे लागते अन्यथा विविध तांत्रिक अडचणी समोर करून त्या मस्टारला शून्य करण्याचा प्रताप या विभागाच्या अधिकाऱ्याकडून केला जातो. आणि या टक्केवारीच्या माध्यमातून अनेकांची वरकमाई झाल्याचे बोलल्या जात आहे. तालुक्यात रोजगार हमी योजनेच्या मध्येमातून सार्वजनिक वृक्ष लागवड वैयक्तिक शेततळे, सिंचन विहीर, जनावारांचे गोठे, पांदन रस्ते, सीसी रस्त्यासह करण्यात येत असलेल्या अनेक कामाचे खुशल मस्टरचे बिल काढण्यासाठी प्रति मस्टरला १७ टक्के खर्च करावा लागतो.अन्यथा आठ दिवसात मस्टर शून्य केला जातो. यामुळे ही योजना लाभार्थ्यां पेक्षा रोहयो विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या लाभाची दिसती. या योजनेचा प्रत्येक्षात किंवा अप्रत्येक्षात लाभ घेयायचं असेल तर प्रथम योजना मंजुरीसाठी पाच हजार मग काम चुलू झाल्यानंतर कामाचे कुशल मस्टर बिल काढण्यासाठी रोहयो विभागातील साह्यक कार्यक्रम अधिकारी यांना ५ टक्के, संबंधित तांत्रिक साह्यक ८ टक्के, वरिष्ठ अधिकारी २ टक्के आणि ऑपरेटर २ टक्के असे एका मस्टर माघे १७ % खर्च करावा लागतो तरच कामाचे बिल काढले जाते. अशी लाभार्थ्यांची मोठी पिळवणूक केली जात आहे. यामुळे ही रोहयो योजना संबंधित अधिकारी, कर्मचारी व काही रोजगार सेवकाचे वरकमाईचे मोठं साधन बनल्याचे अनेक लाभार्थी व नागरिकातून बोलल्या जात आहे.

## ऑनलाईन प्रणालीचा देखावा

रोहयो योजने अंतर्गत झालेल्या कामाचे ऑनलाईन प्रणालीच्या मध्येमातून ग्रामपंचायत मार्फत नेमन्यात आलेल्या रोजगार मित्राकडून काम होत असलेल्या स्थळासह कामगारांचा दररोज ऑनलाईन फोटो काढणे हे बंधनकारक आहे. परंतु यात सगळ्यांची मिलीभगत असल्यामुळे साईडवर नियमानुसार काम न करता फक्त फोटो काढण्यापुरते काम केले जाते.

# विद्यासागर शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विद्यासागर मुलींचे हायस्कूल तामसा या ठिकाणी त्याच दिवशी सकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे सचिव-विठ्ठल राणे कोषाध्यक्ष- विजय लाभशेटवार, सदस्य विनायक चव्हाण, नागोराव हळदे, प्रशालेच्या मुख्याध्यापिका चिंचगव्हाणकर उज्वला यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. देशभक्तीपर गीतावर नृत्य, लावणी, जात्यावरची गाणी, मी जिजाऊ बोलतेय, रिमिक्स गीतावर नृत्य, बंजारा गीत, हास्य नाटिका अशा एकूण २५ प्रकारच्या कलाकृतीचे सादरीकरण करण्यात आले.

# शेंदण ते डाक्याचीवाडी रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे

- निकृष्ट व अर्धवट कामाची चौकशी करण्याची मागणी

**तामसा : (समर्थ गांवकरी)**



हदगाव तालुक्यातील आदिवासीबहुल गावे असलेल्या शेंदण ते डाक्याचीवाडी रस्त्याचे पुलमोऱ्यासह सिमेंट काँक्रीटचे काम अत्यंत निकृष्ट व अर्धवट ठेवल्याच्या तक्रारी वाढल्या असून संबंधित विभागाने त्या कामाचा दर्जाची गुण नियंत्रण विभागाकडून तपासणी करून त्या अर्धवट व दर्जाहीन कामाची तात्काळ चौकशी करण्याची मागणी पुढे आली आहे. आदिवासीबहुल गावांना पक्क्या रस्त्यांनी जोडण्याच्या दृष्टीने शासनाच्या आदिवासी विकास उप - योजनेअंतर्गत पुलमोऱ्यासह सिमेंट काँक्रीटचा मजबूत रस्ता बनविण्यासाठी शासनाने मोठा निधी मंजूर केला होता. सन 2024 मध्ये त्या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन तत्कालीन आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्या हस्ते मोठ्या थाटात करण्यात आले होते. मजबूत रस्ता मिळणार असल्याने डोंगर, दऱ्याखोऱ्यातील अतिदुर्गम भागात राहणाऱ्या नागरिकांना दळणवळणाची सोय होत असल्याचा मोठा आनंद झाला होता. मात्र संबंधित ठेकेदारांने रस्त्याचे काम वेळेत आणि दर्जेदार न करता शासनाच्या निधीचा नुसता धुरळा उडवल्याचे चित्र आहे. बरेच दिवस काम ठप्प ठेऊन चार ते पाच महिन्यापूर्वी त्या रस्त्याचे काम उरकून घेतल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे शेंदण ते डाक्याचीवाडी दोन ते साडेचार किलोमीटर सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला बंदिस्त नाल्याचे काम अर्धवट ठेवल्याचे दिसते. रस्त्याच्या दोन्ही बाजूनी सिमेंट काँक्रिटीकरण करताना एक बाजू दर्जेदार तर दुसरी बाजू मात्र निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून दर्जाहीन केल्याचे निदर्शनात येते. विशेष म्हणजे केलेल्या सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यावर संबंधित कामाची माहिती देणारा फलक लावण्यात आला मात्र त्यावर निधी किती? याचा उल्लेख नसल्याने संभ्रम निर्माण झाला आहे. नव्याने केलेल्या रस्त्यावर तीन ते चार महिन्यातच अक्षरशः धुरळा उडाल्याचे चित्र पाहायला मिळते. रस्त्याच्या एका बाजूच्या नालीचे खोदकाम करून कॉंक्रिटीकरण केले नसल्याने बाजूच्या शेतकऱ्यांच्या शेतात पावसाचे पाणी जाऊन शेताची व पिकाचे प्रचंड नुकसान होत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. काँक्रीटचा रस्ता आणि बंदिस्त नालीच्या मधोमध भर भरला नसल्याने साधारणतः दोन ते अडीच फूट खोलीच्या फटीत एखादे वाहन किंवा जनावरे माणसे पडून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसली तरी या गंभीर प्रकाराकडे संबंधित विभागाने कमालीचे दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट आहे.

# जिओ-बीपीच्या 'ऍक्टिव्ह टेक्नॉलॉजी' पेट्रोलचे अनावरण

**अतिरिक्त खर्चाशिवाय दरवर्षी १०० किमी अधिक ड्रायव्हिंगचा लाभ**

**गोवा : (समर्थ गांवकरी)**



पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्री मा. श्री. हरदीप सिंग पुरी यांच्या हस्ते आज गोवा येथे सुरू असलेल्या इंडिया एनर्जी वीक 2026 दरम्यान जिओ-बीपीच्या क्रांतिकारी 'ऍक्टिव्ह टेक्नॉलॉजी' पेट्रोलचे अनावरण करण्यात आले.

रिलायन्स इंडस्ट्रीज आणि बीपी यांच्या संयुक्त उपक्रमातील रिलायन्स बीपी मोबिलिटी लिमिटेड (RBML) चा कार्यरत ब्रँड जिओ-बीपी यांनी सादर केलेले हे प्रगत पेट्रोल इंजिनमधील महत्त्वाच्या भागांवर साचलेला चिकट मळ सक्रियपणे स्वच्छ करते. परिणामी इंजिनची कार्यक्षमता पूर्ववत होते, संरक्षण वाढते आणि नियमित पेट्रोलच्या तुलनेत वाहनचालकांना दरवर्षी 100 किमी पर्यंत अधिक अंतर पार करण्याचा लाभ मिळतो — तोही कोणत्याही अतिरिक्त किमतीशिवाय.

बीपीच्या 100 वर्षांहून अधिक जागतिक इंधन संशोधन अनुभवावर आधारित, जिओ-बीपीच्या 'ऍक्टिव्ह टेक्नॉलॉजी' पेट्रोलचा विकास आणि प्रमाणीकरण उद्योग-मानक चाचण्या तसेच भारतीय इंजिन परिस्थितीनुसार सानुकूल पद्धती वापरून करण्यात आले आहे.

वास्तविक परिस्थितीत या पेट्रोलची स्वच्छता क्षमता सिद्ध करण्यासाठी कोईम्बतूर येथील टेस्ट ट्रॅकवर एका मोटरसायकलची 4,000 किमीहून अधिक अंतरासाठी चाचणी घेण्यात आली. या चाचणीचे थेट प्रात्यक्षिक इंडिया एनर्जी वीकमध्ये उपस्थित प्रेक्षकांसमोर सादर करण्यात आले.

जिओ-बीपीचे अध्यक्ष सार्थक बेहुरिया म्हणाले, "भारतीय वाहनचालकांना सुरळीत इंजिन, जास्त विश्वासार्हता, कमी देखभाल खर्च आणि अधिक मायलेज हवे असते. 'ऍक्टिव्ह टेक्नॉलॉजी' पेट्रोल हे गाडी चालू असतानाच इंजिन स्वच्छ करते, ज्यामुळे हानिकारक मळाचे दुष्परिणाम कमी होतात. उच्च-कार्यक्षमतेची इंजिन स्वच्छता ही आता एक मानक वैशिष्ट्य बनवून, प्रगत इंधन तंत्रज्ञान सर्वांसाठी उपलब्ध करणे हे आमचे ध्येय आहे."

जिओ-बीपीचे CEO अक्षय वाधवा म्हणाले, "इंडिया एनर्जी वीक 2026 मध्ये आम्ही दोन मोटरसायकल्सचे थेट प्रात्यक्षिक सादर केले आहे—एक 'ऍक्टिव्ह टेक्नॉलॉजी' पेट्रोलवर आणि दुसरी सामान्य पेट्रोलवर. प्रगत बोरोस्कोप इमेजिंगद्वारे स्वच्छतेतील स्पष्ट फरक दिसून येतो. पाच वर्षांच्या संशोधनातून विकसित झालेले हे पेट्रोल इंधन कार्यक्षमता वाढवतेच, शिवाय देखभाल खर्चही कमी करते."

इंडिया एनर्जी वीकमधील आपल्या स्टँडवर जिओ-बीपीने इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सोल्युशन्स, एव्हिएशन टर्बाइन फ्युएल (ATF), घरपोच डिझेल सेवा तसेच सध्याच्या व भविष्यासाठी सज्ज विविध वायू इंधनांचा व्यापक पोर्टफोलिओ सादर केला.


# आज सेवापूर्ती सत्कार सोहळा

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

श्री शिवाजी कॉलेजचे मराठी विभाग प्रमुख, माजी एनसीसी विभाग प्रमुख, प्रोफेसर डॉ.दिलीप सावंत यांचा सेवापूर्ती सत्कार व 'अस्मितेच्या पाऊलवाटा' या गौरव ग्रंथाचा प्रकाशन सोहळा आज शनिवारी, दि.३१ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता श्री शिवाजी कॉलेज, कंधार येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार, ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी, कंधारचे सचिव गुरुनाथराव कुरुडे, तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी, कंधारचे अध्यक्ष प्रा.डॉ. पुरुषोत्तम धोंडगे, श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी, कंधारचे सहसचिव ॲड.मुक्तेश्वर धोंडगे, श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी, कंधारचे उपाध्यक्ष माधव पेठकर, अहमदपूरच्या महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार, अंबाजोगाईच्या खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांची उपस्थिती राहणार आहे.

# 'जो इश्क हुआ' हे नवे गाणे प्रदर्शित

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



"मान मेरी जान" आणि "तु जाना ना पिया" सारख्या रोमँटिक हिट गाण्यांनी संपूर्ण पिढीला प्रेमात बुडवणारे पॉप स्टार किंग या लग्नसराईच्या हंगामात "जो इश्क हुआ" या आणखी एका गाण्यासह परत आला आहे. हे गाणे हृदयस्पर्शी असून नात्यांमध्ये उबदारपणा आणते आणि कायमच्या प्रेमाला समर्पित आहे. किंगने भावनिकदृष्ट्या प्रभावी गीतांना आठवणींमध्ये राहणाऱ्या सूरांसोबत मिसळून "जो इश्क हुआ" हे गाणे सादर केले आहे. हे सदाबहार आणि कायमचे प्रेम व्यक्त करणारे प्रेमगीत आहे. हे गाणे अशा नात्यांचा उत्सव साजरा करते जे आपल्याला आपल्या जोडीदाराशी असलेले नातं, त्यातील विश्वास आणि प्रेम व्यक्त करण्यास शिकवतो. "जो इश्क हुआ" च्या म्युझिक व्हिडिओमध्ये लोकप्रिय अभिनेत्री श्रिया पिळगावकर आहे, जी किंगच्या आगामी अल्बम, राजा हिंदुस्तानीची झलक दाखवते. जयपूरच्या राजेशाही परिसरात शूट केलेल्या जो इश्क हुआ' या म्युझिक व्हिडिओमध्ये लग्नाच्या थीमवर आधारित कथा दाखवली आहे, जी बालपणातील प्रेमापासून सुरू होऊन आयुष्यभर टिकणाऱ्या नात्यापर्यंत पोहोचते. पारंपरिक हळदी आणि वरमाला समारंभांच्या पार्श्वभूमीवर सेट केलेला हा व्हिडिओ शाळेच्या दिवसातील आठवणी आणि वर्तमानातील लग्नसोहळा एकत्र दाखवतो. गाण्याची सुरुवात हळुवारपणे होऊन ते एका भव्य, सिनेमॅटिक संगीतमय वातावरणात उलगडते.

गाण्याबद्दल बोलताना किंग म्हणाला, "जो इश्क हुआ हे खूप प्रामाणिकपणे तयार केलेले गाणे आहे. हे अशा प्रेमाचे प्रतीक आहे ज्याला घोषणा करण्याची गरज नाही, ते फक्त टिकून राहते. हे गाणं सौम्य, हृदयाला स्पर्श करणाऱ्या क्षणांपासून सुरु होऊन एका भव्य, प्रभावी आवाजात बदलते, जे प्रेमाची उब दाखवते. आम्हाला हे गाणं सिनेमॅटिक पण खासगी वाटावं असे हवे होतं, जे प्रत्येक खास क्षणासाठी योग्य असेल." अभिनेत्री श्रिया पिळगावकर म्हणाली, "मला नेहमीच किंगचे संगीत आणि त्यांची ऊर्जा आवडते. जयपूरमध्ये, विशेषत: एका राजवाड्यात शूटिंग केल्यामुळे कथेला एक सुंदर कालातीत अनुभव मिळाला. हे गाणं स्वतःमध्ये सौम्य, रोमँटिक आहे आणि त्यात मजबूत भावनिक संबंध आहे.

# मोकाट जनावरांवर आळा घालण्यासाठी पशुपालकांची संयुक्त बैठक



**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट नगरपरिषद कार्यक्षेत्रात मोकाट फिरणाऱ्या अश्ववर्गीय जनावरांमुळे (गाढव/खेचर) होणाऱ्या अपघातांच्या वाढत्या घटनांची दखल घेत, नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांच्या सुचनेनुसार नगरपरिषद व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने पशुपालकांची बैठक घेण्यात आली. ही बैठक नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीत संपन्न झाली. बैठकीत कामकाजानंतर जनावरे रस्त्यावर मोकाट सोडू न देता निश्चित व सुरक्षित ठिकाणी बांधून ठेवण्याच्या सूचना पशुपालकांना देण्यात आल्या. तसेच बांधून ठेवलेल्या जागेबाबतची माहिती नगरपरिषद प्रशासनास देणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. कोणतेही जनावर रस्त्यावर मोकाट आढळल्यास महाराष्ट्र नगरपरिषद व नगरपंचायत अधिनियम १९६५ अन्वये कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला.

मोकाट जनावरांचा प्रश्न सोडवण्यासाठी पशुपालकांनीही सूचना मांडल्या, त्यांची प्रशासनाने सकारात्मक दखल घेतली. या संदर्भात आवश्यक उपाययोजना करण्यासाठी पशुपालकांना दि. ५ फेब्रुवारी २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली. बैठक शांततेत व यशस्वीरीत्या पार पडली.

# अशोकराव तुम्ही कुठेही जा आम्ही तुमचेच हाय नांदेडचा सातबारा अशोकराव चव्हाण यांच्या नावे

- महानगरपालिकेतील निवडणुकीत नांदेडकरांनी दाखवलाय विश्वास इतिहासात पहिल्यांदाच होणार भाजपाचा महापौर इतिहास नोंद होणार तर सत्तेत असलेल्या शिवसेना . राष्ट्रवादी . सह इतर पक्षांना चपराक

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**




अशोकराव तुम्ही कुठेही जा आम्ही तुमचेच हाय नांदेडचा सातबारा अशोकराव चव्हाण यांच्या नावे असल्याचे महानगरपालिकेतील निवडणुकीत नांदेडकरांनी दाखवलाय शंभर टक्के विश्वास दाखवलाय इतिहासात पहिल्यांदाच होणार भाजपाचा महापौर इतिहास नोंद होणार तर सत्तेत असलेल्या शिंदे शिवसेना . राष्ट्रवादी कॉंग्रेस सह इतर पक्षांना चपराक भाजपाचे निंविवाद वर्चस्व प्रस्थापितावर केली मात ८१ जागे पैकी ४५ नगरसेवक निवडुन आले असून नांदेड महानगर पालिकेवर भाजपाचा च झेंडा फडकणार व भाजपाचा पहिल्यांदा होणार नांदेड चा महापौर. नुकत्याच झालेल्या निवडणुकी मध्ये नांदेड जिल्ह्यातील शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काग्रेस चे एकुण पाच आमदार असून यांच्या सह अनेकांनी महानगर पालीकेवर सत्ता मिळवण्यासाठी शर्यती चे प्रयत्न केले व अशोकराव चव्हाण यांच्या हाती सत्ता येऊ नयेत म्हणून सगळेच प्रयत्न केले मात्र नांदेड च्या जनतेने शेवटी दाखवून दिले अशोकराव तुम्ही कुठेही जा आम्ही तुमचेच हाय हे स्पष्ट दाखवून दिले असून या पुर्वी अशोकराव चव्हाण हे कॉंग्रेस पक्षा मध्ये कार्यरत होते तेंव्हा मात्र नांदेड जिल्ह्यात फक्त आणि फक्त कॉंग्रेस ची एक हाती सत्ता होती नांदेड महानगर पालिका असो जिल्हा परिषद असो की विधानसभा असो कि इतर कोणतीही निवडणूक असो या मध्ये कॉंग्रेस पक्ष एक नंबर असायचा मात्र आज सध्या भाजपा एक नंबर आहे कारण जिल्ह्यातील सर्व सामान्य जनतेचा शंभर टक्के विश्वास अशोकराव चव्हाण यांच्या वर असल्याचे हे सिद्ध करुण दाखवले असून महाराष्ट्र राज्यात सत्तेत असलेले शिंदे शिवसेनेचे चार आमदार आहेत मात्र यांना दोन आखडी आकडा गाठता आले नाही त्या साठी या सर्व बाबी वर शिवसेने च्या चारही आमदारा सह जिल्हाप्रमुख यांनी अत्मचिंतन करणे गरजेचे आहे एके काळी शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नांदेड दक्षिण मध्ये सध्या शिवसेनेचे आमदार असून सिडको . हाडको . कौठा .वसरणी .असर्जन .असदवन . या सह परिसरात एकुण ६० हजार ९४६ मतदार संख्या असून या मध्ये दोन प्रभाग आहेत प्रभाग क्र १९ या प्रभागात ४ नगरसेवक तर प्रभाग क्र २० मध्ये ५ नगरसेवक असून ९ नगरसेवका पैकी विद्यमान आमदार बोंढारकर यांना एकही नगरसेवक निवडुन आणु शकले नाहीत तर या वरुण लाजीरवाणी बाब काय आहे ते त्यांनी स्वता अत्म परिक्षण करून पक्षाचे काम जामोने वाढवतील का खुडवतील हेच येत्या जिल्हा परिषद पंचायत समिती मध्ये बघावा लागेल कारण विधान सभा निवडणुकी वेळी जो सर्व सामान्य कार्यकर्ते यांनी जिवाचे रान करून शिवसेना पक्षा साठी काम केले असे अनेक कार्यकर्ते यांचे मन दुखल्याचे दिसून येत असून ते पण सध्या शांत असल्याचे दिसते तर उत्तर चे आमदार बालाजी कल्याणकर यांनी स्वबळावर निवडणूक लढवली मात्र त्यांनी तिन जागेवर जीत मिळवली असून काही जागेवर मोजक्या मताधिक्याने उमेदवार पराभुत झाल्याचे चित्र दिसते मात्र दक्षिण मधील प्रभाग क्र १९ व २० मध्ये मोठ्या फरकाने उमेदवार पराभुत झाले आहे त्यामुळे या पुढील होणाऱ्या निवडणुकीत चित्र काय असेल हेच पाहावे लागेल कारण संघटनात्मक बांधणी वरूण नांदेड दक्षिण च्या आमदारांवर अनेकांनी प्रश्न चिन्ह उपस्थित केले जात आहेत.

# अजित पवार यांच्यानंतर पुढे काय..?

राष्ट्रवादीमधून बाहेर पडत अजित पवार यांनी वेगळी राष्ट्रवादी निर्माण केली. शरद पवार यांच्यानंतर राष्ट्रवादीचे भवितव्य काय, असा प्रश्न त्या वेळी उपस्थित झाला. तेव्हा अनेकजण अजित पवार यांच्यासोबत गेले. आता अजितदादांच्या निधनानंतर पक्ष सांभाळण्याचे, वाढवण्याचे काम कोणी करायचे? आमदार, खासदार, कार्यकर्त्यांना ताकद कोणी द्यायची? असे प्रश्न सामान्य कार्यकर्त्यापासून पक्षाच्या मंत्र्यांपर्यंत सगळ्यांना पडलेले आहेत. शरद पवारांनी राष्ट्रवादी पक्ष स्थापन केल्यापासून मधला काही काळ वगळला तर कायम हा पक्ष सत्तेत राहिला. तत्कालीन उपमुख्यमंत्री छगन भुजबळ, आर. आर. पाटील आणि नंतर अजित पवार तिघांनीही सत्तेत राहून पक्ष वाढवण्याचे काम नेटाने केले. भुजबळ यांनी ओबीसींची मोट बांधली. आर. आर. यांनी मराठा समाजातील तरुणांना ताकद देण्याचे काम केले, तर अजित पवार यांनी जातीपातीच्या पलीकडे जाऊन गावागावांत पक्ष नेण्याचे काम केले. यामुळे कार्यकर्त्यांना बळ मिळाले. पक्ष उभा राहिला. शरद पवार यांचे धोरणी राजकारण आणि अजित पवारांची थेट भिडण्याची भूमिका यातून पक्षाला ताकद मिळत गेली. देवेन्द्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे एकत्र आल्यानंतर विरोधात राहून पक्ष वाढवणे कठीण आहे, हे लक्षात येताच अजित पवार यांनी पक्षातल्या नेत्यांची मोट बांधून भाजपसोबत सत्तेत सहभागी



## संपादकीय

होण्यास मागेपुढे पाहिले नाही. विद्यमान पक्षात वित्तमंत्रिपद त्यांच्याकडेच असल्यामुळे प्रत्येक मंत्र्याचे काम त्यांच्याकडे पडायचे. त्यातून कार्यकर्त्यांना, स्थानिक आमदारांना बळ देता येते हे त्यांनी दाखवून दिले होते. आता तेच राहिले नाहीत तेव्हा आमचे काम कोण करणार? हाच प्रश्न प्रत्येकाच्या मनात आहे. खा. सुप्रिया सुळे यांनी पक्षाची सूत्रे सांभाळली तरी राज्य सरकारमध्ये राहून जेवढी ताकद कार्यकर्त्यांना, आमदारांना देता येते तेवढी त्या लोकसभेत बसून कशी देणार? इथे गावागावात आमदारांचे छोटे-मोठे प्रश्न मंत्रालयातल्या सहा मजल्यांमध्ये आहेत. कार्यकर्त्यांची स्थानिक पातळीवर कामे छोट्या-मोठ्या अधिकाऱ्यांकडे असतात. अशा वेळी उपमुख्यमंत्री पदावर



असलेल्या नेत्याने फोन करून मंत्रालयातून किंवा स्थानिक पातळीवरून कामे करून घेतली की कार्यकर्त्यांना, नेत्यांना ताकद मिळते. दिल्लीत राहून ही कामे कशी होणार? दादांचे पार्थिव अनंतात विलीन झाल्यानंतर अनेक नेते हाच मुद्दा मांडत होते. एक नेते म्हणाले, आम्हाला तर राजकारण सोडून द्यावे वाटत आहे. कोणाकडे बघून राजकारणात राहायचे? आम्हाला आमच्या मतदारसंघात टिकून राहायचे असेल तर आमची कामे व्हावी लागतील. कार्यकर्त्यांना ताकद द्यावी लागेल. त्यासाठी जवळ सत्ता असावी लागेल. असलेल्या सत्तेसाठीचे नेतृत्व सर्वसमावेशक हवे. हे सगळे गुण असणारा नेता या गर्दीत मी शोधत आहे. एक तरी नेता खांद्यावर हात टाकून "चल मी आहे, काळजी करू नकोस", असे म्हणेल असे वाटत होते. मात्र कोणीही असे म्हणताना दिसले नाही... ज्या नेत्यांकडे आम्ही आश्रने पाहत होतो तेच नेते ढसाढसा रडताना पाहिले. तेच इतके हतबल आहेत तर आम्ही आमदारांनी आणि आमच्या जीवावर असणाऱ्या कार्यकर्त्यांनी करायचे काय..? हे सांगताना त्या आमदाराच्या डोळ्यांतही पाणी होते.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ७८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 3 | | | 9 | | 8 | 2 | |
| 1 | | | | | | | 5 | 9 |
| | 5 | | 3 | | | | 7 | |
| | 1 | | 2 | | 6 | | | |
| 4 | | | 9 | 5 | 3 | | | 8 |
| | | | 4 | | 7 | | 3 | |
| | 4 | | | | 2 | | 8 | |
| 3 | 7 | | | | | | | 5 |
| | 9 | 8 | | 7 | | | 6 | 3 |

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेंन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ७७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 5 | 7 | 9 | 1 | 3 | 2 | 6 | 4 |
| 6 | 3 | 1 | 8 | 2 | 4 | 9 | 7 | 5 |
| 9 | 4 | 2 | 6 | 7 | 5 | 3 | 8 | 1 |
| 3 | 2 | 8 | 4 | 9 | 1 | 7 | 5 | 6 |
| 1 | 7 | 5 | 3 | 6 | 2 | 8 | 4 | 9 |
| 4 | 6 | 9 | 7 | 5 | 8 | 1 | 3 | 2 |
| 2 | 9 | 6 | 5 | 8 | 7 | 4 | 1 | 3 |
| 5 | 8 | 3 | 1 | 4 | 9 | 6 | 2 | 7 |
| 7 | 1 | 4 | 2 | 3 | 6 | 5 | 9 | 8 |

उत्तर उद्याच्या अंकात

**पंचांग**
३१ जानेवारी २०२५
शनिवार
विक्रम संवत्- २०८२
माघ शके संवत्- १९४७
संवत्सर – विश्वावसूनाम

अयन- उत्तरायणारंभ
मास- माघ
ऋतु- सौर शिशिर
शुक्ल पक्ष
तिथि:त्रयोदशी
०८:२५:४८

तिथि:चतुर्दशी
२९:५२:५०+
नक्षत्र:पुनर्वसु
२५:३३:४७+
योग:विष्कुम्भ
१३:३२:५५

## उपदेशाचे डोस

### वर्डस्वर्थची कविता

स्वामी विवेकानंदाचे नाव लहानपणी होते नरेंद्र. नरेंद्र ज्या महाविद्यालयात जात होता त्या 'जनरल असेंब्ली कॉलेज'चे प्राचार्य होते विल्यम हेस्टी. नरेंद्राविषयी त्यांना अभिमान होता. एकदा ते वर्गात विल्यम वर्डस्वर्थची 'एक्स्कर्शन' ही सुप्रसिद्ध कविता शिकवीत होते. तीत 'एक्स्टसी' असा एक शब्द आहे. समाधीसारख्या या ास्थितीत मनाची कोणती आणि कशी अवस्था असते हे ते रंगून जाऊन वर्णन करीत होते. ईश्वराप्रत जाऊन पोहोचलेल्या माणसाला ही अवस्था प्राप्त होते असे त्यांनी सांगितले. 'ईश्वर' शब्द ऐकल्यावर नरेंद्र उभा राहिला आणि त्याने विचारले, 'सर, आपण ईश्वराप्रत पोहोचलेले आहात का? आपण ईश्वर पाहिला आहे का?' प्रा. हेस्टी म्हणाले, 'नाही रे मित्रा, मी देव पाहिलेला नाही पण तुला याविषयीची खरोखरच आवड आणि कळकळ असेल तर तू दक्षिणेश्वराला जा. तेथील कालीमातेचा पुजारी रामकृष्ण परमहंस नावाचा आहे. त्याला अशी वारंवार समाधी लागते आणि त्याने देव पाहिला आहे असे म्हणतात.' नरेंद्राने यापूर्वी केव्हातरी रामकृष्ण परमहंसांचे नाव ऐकले होते पण प्राचार्यांनी त्यांचा उल्लेख केल्यावर त्याची रामकृष्णांच्या भेटीची इच्छा अधिकच तीव्र झाली.

कथा उपदेश : आपल्या ध्येयाबद्दल आवड आणि कळकळ असेल तर तेथे पोचण्यासाठी मार्ग मिळतोच.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १५०४ – फ्रांसने नेपल्स अरागोनच्या राज्याला दिले.
- १८६५ – अमेरिकन गृहयुद्ध – रॉबर्ट ई. ली दक्षिणेच्या सरसेनापतीपदी.
- १८७६ – अमेरिकेने स्थानिक रहिवाश्यांना आरक्षित जमीनींवर स्थलांतर करण्यास भाग पाडणारी हुकुम काढला.
- १९१५ – पहिले महायुद्ध – जर्मनीने रशियाच्या सैन्याविरुद्ध विषारी वायुचा उपयोग केला.
- १९२९ – सोवियेत संघाने लिओन ट्रोट्स्कीला हद्दपार केले.

### राष्ट्रीय

- २००७ – टाटाने अ‍ॅग्लो–डच पोलाद कंपनी कोरस ग्रुप ११ अब्जापेक्षा अधिक बोलीत खरेदी केला.
- २००८ – माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील जगभरातील सर्वोत्कृष्ट १०० कंपन्यांमध्ये २९ भारतीय कंपन्यांचा समावेश करण्यात आला.


### जन्म

- १३३८ – चार्ल्स पाचवा, फ्रांसचा राजा यांचा जन्म.
- १५१२ – हेन्री, पोर्तुगालचा राजा यांचा जन्म.
- १९३८ – बियाट्रिक्स, नेदरलँडची राणींचा जन्म.
- १९७५ – प्रिती झिंटा, हिंदी चित्रपट अभिनेत्रींचा जन्म.

### निधन

- १३९८ – सुको, जपानी सम्राट यांचे निधन.
- १४३५ – सुवांदे, चीनी सम्राट यांचे निधन.
- १५८० – हेन्री, पोर्तुगालचा राजा यांचे निधन.
- १७८८ – चार्ल्स एडवर्ड स्टुअर्ट, इंग्लंडचा स्वयंघोषित राजा यांचे निधन.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ७८



### आडवे शब्द

१. नष्ट होणारे
३. पृथ्वी
५. लाचलुचपतीची कमाई
९. द्यूतात नशीब बदलणारा
१०. मर्कट
१२. घाण, धूळकट थर
१३. प्रतिष्ठित
१६. साका, कचरा
१८. ठार मारणे (वा.प्र.)
२४. पौर्णिमा
२५. दान दिल्याचा कागद
२७. नौदल
२८. रमापती
३०. डोंगराचे उभे टोक
३१. आई
३२. मारल्याची खूण
३३. जीभ
३४. खर्चाची दुसरी बाजू
३६. आवाज, छंद
३७. कृष्णसखी
३८. होम, यज्ञ
३९. कमलनयन
४०. शाब्दिक हजामत
४२. परंतु
४३. खोकला
४५. तुझे
४६. जपानी चलन
४७. जाणे-येणे, वहीवाट
४८. मनसोक्त
५०. मोठी बहीण
५२. सेवक
५३. वन्य पशू
५५. श्रीयुत
५७. होकाराच्या विरुद्ध
५९. मुरली
६०. धमकी
६१. निकट, जवळ
६३. तह, तहाचा मसुदा
६४. मर्यादा
६५. राजा, सम्राट
६६. व्यवस्था, कामाची व्यवस्था

### उभे शब्द

१. अत्यल्प
२. नमनीय
३. व्रत
४. मुंबईकरांचा घरगडी
५. विहीर
६. खास पुणेरी चटकदार पदार्थ
७. राष्ट्रीय फूल
८. बूड
११. शंकराला प्रिय असणारे फळ
१४. नरक
१५. उगीच
१६. गीत
१७. चीजवस्तू
१९. जाड सतरंजी
२०. अत्यंत घाबरणे (वा. प्र.)
२१. जहर
२२. वार्ताहरांबरोबर बैठक
२३. पाठ्यपुस्तकातील गीत
२६. धावण्याबरोबर पळण्याचा शब्द
२७. करून सवरून वेगळे राहणे
२९. फळातील द्रव
३२. चेहरा, मुख
३४. एक बारीक धान्य
३५. इंद्रिय
३६. अंगण वाकडे म्हणणाऱ्यांची खरी स्थिती
३७. रक्षा
३८. आग्रही स्वभाव
४१. प्रवासातील टप्पा
४३. कर्णेंद्रिय
४४. समूह, जमाव
४५. पाण्यावरील तेलाचा थर
४८. रम्य
४९. ढीग
५०. टवटवी, ताजेपणा (हिंदी)
५१. मंत्रीमंडळ
५३. अरण्य
५४. सिंह
५५. चामखीळ
५६. एकरूप
५८. सुंदर युवती
५९. छोटा, लहान
६०. औषध
६२. अंधार
६३. मडके
६४. चबुतरा, कट्टा

### शब्दकोडे क्र. ७६ चे उत्तर

आडवे उत्तर : १.दुर्जन ४.सामदामदंडभेद १०.जवळजवळ ११.गट १२.सारा १३.डबर १५.काका १६.लगाम १७.गरम १९.माळकरी २०.सारंग २१.नवरस २४.सरा २५.याग २६.नरमगरम २८.अनाथाश्रम २९.बकबक ३१.नाद ३२.जगन्नाथ ३३.कली ३४.ताई ३५.साल ३६.भकास ३८.कानशील ४०.बादल ४२.राम ४३.कळप ४४.अवसान ४६.शाल ४७.डबल ४९.लवाद ५१.तरस ५३.चोर ५४.चाकर ५६.यान ५९.उपकार ६०.लवाजमा ६३.वतनवाडी ६६.मालदार ६७.लस ६९.महाकाय ७१.साहस ७२.महासागर ७३.चरखा ७४.वरवर

उभे उत्तर : १.दुपेंड २.नजर ३.खळबळजनक ४.सावकारी ५.मळका ६.मजलदरमजल ७.डगमग ८.भेट ९.आराम हराम १२.सार १४.बजरंगबली २०.साया २१.नगद २२.वर २३.अनाथ २४.सश्रम कारावास २७.मनाई २८.अन्नान्नदशा ३०.बस्तान ३३.कलकलाट ३४.ताल ३५.सालोसाल ३७.सम ३८.कापडचोपड ३९.शीतल ४१.ललत ४४.अनाकलनीय ४५.नवा ४८.बरका ५०.दया ५२.रतन ५५.रवा ५७.नवरदेव ५८.ताडी ६१.जमादार ६२.माल ६४.वार्ताहर ६५.तलम ६८.सहा ६९.मग ७०.हार ७१.साव

# वारकऱ्यांचे स्वप्न साकारण्याचा भक्तांना सेवायोग

- ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज बुलढाणेकर
- जगद्गुरु संत तुकाराम महाराज जन्मोत्सव सोहळा



**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**

वारकऱ्यांची स्वप्न साकार करण्याचा सेवायोग पंचक्रोशीतील संत तुकाराम भक्तांना आला असून गुरुवर्य दशरथ महाराज अंभोरे यांनी शितलादेवीच्या पवित्र भूमीत वारकरी संप्रदाय रुजविणेच्या दृष्टीने निवासी आश्रम उभारण्याचा निर्णय घेतला असून या माध्यमातून धार्मिक क्षेत्रातील कलागुणांना वाव देऊन कीर्तनकार तयार करण्यासाठी उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याने आदर्श पिढी घडवण्यासाठी भविष्यात याचा फायदा होणार असल्याचे तालुकास्तरीय कीर्तन सोहळ्यात ह. भ. प. पुरुषोत्तम महाराज बुलढाणेकर यांनी सांगितले आहे.

बारड (ता. मुदखेड) नगरीत संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज जन्मोत्सव सोहळ्याचे दी २५ (रविवार) आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त श्री विठ्ठल मूर्तीची स्थापना करण्यात आली आहे. जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त सुप्रसिद्ध कीर्तनकार, आवाजाचे जादूगर ह भ प पुरुषोत्तम महाराज पाटील बुलढाणेकर यांचे यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भक्तांसाठी महाप्रसाद ठेवण्यात आला होता. ह. भ. प. दशरथ महाराज अंभोरे यांनी मुख्य राष्ट्रीय महामार्ग लगत वीस गुंठे जागा खरेदी करून सुंदर आश्रमाची उभारणी केली आहे. संत ज्ञानेश्वर वारकरी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून वारकरी संप्रदायातील मुलांसाठी निवासी वारकरी शाळा सुरू केली आहे. या माध्यमातून दरवर्षी वारकरी शाळेत 40 ते 50 मुलांनी धार्मिक शिक्षण घेत आहेत. युवा पिढीला व्यसनापासून रोखून सांप्रदायिक मार्गावर आणण्यासाठी उचललेले महत्वपूर्ण पाऊल समजले जात आहे विशेष म्हणजे दररोज गावात अन्नदीक्षा गोळा करून दोन वेळेसच्या भोजनाची व्यवस्था केली जाते. वारकरी शाळेत मुलांना मृदुंग, टाळ, वीणा याशिवाय कीर्तनकार बनण्याचे धडे शिकविले जातात.

जगद्गुरु संत तुकाराम महाराज जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त आयोजित तालुकास्तरीय कीर्तन सोहळ्यात पुरुषोत्तम महाराज यांनी अनु रेणू थोकडा तुका आकाशा एवढा या अभंगाच्या आशयाने कीर्तनातून भक्तांना आदर्श जीवन जगण्याचा मार्ग सांगितला. वैरी रामेश्वर भट्ट यांनी संत तुकारामाची केलेली स्तुती खरोखरच वाखण्याजोगी असून कीर्तनाचा शेवट तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम अशी तुकारामाची ख्याती असून वारकरी संप्रदायाची ताकद यावरून लक्षात येते. आई माझी मायेचा सागर या सुमधुर घाण्याने भक्तांची लक्ष वेधून घेतले. पुरुषोत्तम महाराजांनी आजकाल भरकटच चाललेल्या राजकारणाचा समाचार घेतला. यावेळी सत्ताधाऱ्यांना निवडून आणण्यात वारकऱ्यांचे मोठे योगदान असल्याचे निक्षून सांगितले. परंतु याचा विसर सर्वच राजकारण्यांना पडत असल्याने भोकर विधानसभेचे आमदार विजया चव्हाण अपवाद असून रंजन कार्यक्रमाऐवजी धार्मिक कार्यक्रमाला प्रथम पसंती दिल्यामुळे वारकरी संप्रदायाच्या उपक्रमाला चालना मिळण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संत ज्ञानेश्वर वारकरी शिक्षण संस्थेच्या सभागृहासाठी भरी निधी देण्याचे आश्वासन आमदार श्रीजया चव्हाण यांनी ह.भ.प दशरथ महाराज आंभोरे यांना दिले आहे.

## श्री शिव छत्रपती महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त मराठी काव्यवाचन स्पर्धा संपन्न

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे श्री शिव छत्रपती महाविद्यालय जुन्नर मराठी विभाग,मराठी वाङ्मय मंडळ,आणि (IQAC) विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त मराठी काव्यवाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कला शाखेचे प्रमुख डॉ.अभिजीत पाटील होते. त्यांनी "मराठी भाषेचे महत्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता आणि अभिव्यक्ती कौशल्य विकसित करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व असल्याचे मत अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले".कार्यक्रमाचे प्रस्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ.वंदना नढे यांनी केले त्यांनी महाराष्ट्र राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे असे मराठी भाषेचे महत्व आपल्या मनोगतातून व्यक्त केले




कार्यक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी स्वरचित,प्रसिद्ध तसेच आपल्या आवडीच्या कविता सादर करून मराठी भाषेवरील प्रेम आणि साहित्य बद्दलच्या भावना व्यक्त केली.विद्यार्थ्यांच्या काव्य सादरीकरणामुळे कार्यक्रमात उत्साही व साहित्यिक वातावरण निर्माण झाले.संस्थेचे अध्यक्ष अॅड संजय शिवाजीराव काळे,अध्यक्ष प्रतिनिधी प्रा.व्ही.बी. कुलकर्णी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.बी. वाघमारे यांनी या कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन नम्रता सोनवणे तर आभार प्रा.विष्णू घोडे यांनी केले.

# फन ऑन द रन' चित्रपटातील खास गाणे

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

'भाभीजी घर पर हैं! – फन ऑन द रन' हा आपले आवडले विश्व मोठ्या पडद्यावर घेऊन येण्यासाठी सज्ज होत असताना, चित्रपटाने आता आपल्या कथेला हृदय देणारे खास गाणे — 'मनजोगी' सादर केले आहे. सदैव मधुर आवाजासाठी ओळखले जाणारे सोनू निगम यांनी गायलेले हे रोमँटिक गाणे सौम्य, अंतरंग आणि मनाला शांत करणारे आहे. प्रेमाच्या सर्वात प्रामाणिक आणि निवांत भावनांना पकडणारी ही चाल, चित्रपटातील गोंधळ आणि विनोदामध्ये प्रेक्षकांना एक सुंदर, संगीतमय विराम देते. बॉर्डर 2च्या भावनिक तीव्रतेनंतर, 'मनजोगी' मध्ये सोनू निगम हलक्या-फुलक्या आणि खेळकर सिनेमॅटिक विश्वाला आपला आवाज देताना दिसतात. गीतकार गुलाम मोहम्मद खावर यांनी लिहिलेले आणि संगीतकार




विशाल शेळके यांनी संगीतबद्ध केलेले 'मनजोगी' हे गाणे आपल्या निर्मळ भावनेमुळे आणि भावनिक खोलीमुळे वेगळे ठरते. यातील शब्दांमध्ये एक नैसर्गिक मृदूपणा आहे, तर चालीत मनाला शांत करणारी ऊब आहे — आणि हे सर्व मिळून एक असे रोमँटिक गाणे तयार होते, जे शांतपणे परंतु खोलवर श्रोत्यांच्या मनात बराच वेळ रेंगाळत राहते. झी सिनेमा, संजय कोहली आणि बिनैफर कोहली निर्मित आणि झी स्टुडिओज व संजय कोहली प्रस्तुत 'भाभीजी घर पर हैं! – फन ऑन द रन' या एडिट II निर्मित चित्रपटात शुभांगी अत्रे, विदिशा श्रीवास्तव, आसिफ शेख, रोहिताश्व गौर, रवि किशन, मुकेश तिवारी आणि निरहुआ यांच्या महत्त्वाच्या भूमिका आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन शशांक बाली यांनी केले असून झी स्टुडिओज हा चित्रपट 6 फेब्रुवारी 2026 रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित करणार आहे. जरी 'भाभीजी घर पर हैं! – फन ऑन द रन' हा चित्रपट मोठ्या पडद्यावर हशा, गोंधळ आणि अफाट कॉमेडीचे मनोरंजन देण्याचे वचन देत असला, तरी 'मनजोगी' हे गाणे चित्रपटात एक नाजूक भावनिक स्तर आणते आणि प्रेक्षकांना आठवण करून देते की प्रेम जेव्हा साधेपणाने व्यक्त केले जाते, तेव्हाच ते सर्वाधिक प्रभावी ठरते. प्रेम, हास्य आणि सुरांची अनुभूती घ्या — 'भाभीजी घर पर हैं! – फन ऑन द रन' हा चित्रपट 6 फेब्रुवारी 2026 रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होत आहे.

## 'सुगंधाचा वारसा' देऊन केले सन्मानित

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील सर्वात मोठ्या अगरबत्ती उत्पादकांपैकी एक असलेल्या सायकल प्युअर अगरबत्तीच्या वतीने राष्ट्रीय चालक दिनानिमित्त देशभरातील चालकांना 'व्हाईब पॉवरबॅग एअर फ्रेशनर'चे वाटप करून त्यांचा सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एमएसआरटीसी), ओला कंझ्यूमर, व्हीआरएल, कर्नाटक राज्य मार्ग परिवहन महामंडळ (केएसआरटीसी), इंडियन फेडरेशन ऑफ अॅप-बेस्ड ट्रान्सपोर्ट वर्कर्स (आयएफएटी) आणि डीटीसी (दिल्ली ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन) यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबवण्यात आला.

# शिल्पा शिंदे ऊर्फ अंगूरी भाबीला कर्जतमध्ये सापडली निरामय शांतता

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पडद्यावर निरागस, मोहक आणि खट्याळ अंगूरी भाबीच्या भूमिकेतून प्रेक्षकांचे मन जिंकणाऱ्या शिल्पा शिंदे यांना खऱ्या आयुष्यात मात्र निसर्गाच्या सान्निध्यात एक वेगळाच आनंद आणि समाधान लाभले आहे. शहराच्या धावपळीपासून आणि गोंगाटापासून दूर, कर्जतमधील स्वतःच्या फार्महाऊसमध्ये त्या आज शांत, प्रसन्न आणि समतोल जीवन जगत आहेत. स्वप्नवत आणि आरामदायी अशी ही जागा शिल्पा यांनी अत्यंत जिव्हाळ्याने उभारली असून, आता ते केवळ फार्महाऊस न राहता त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. येथे त्या शेतीचा मनमुराद आनंद घेत आहेत. स्वतः रोपे लावत आहेत, भाजीपाला पिकवत आहेत, औषधी वनस्पतींची निगा राखत आहेत आणि मातीशी नातं जोडत आहेत. हिरव्यागार वातावरणात सकाळची चाल,



ताज्या हवेत श्वास घेणं आणि जमिनीत हात मळवणं. हे सारे क्षण त्यांना अंतर्मुख करणारे ठरत आहेत. आपला अनुभव सांगताना शिल्पा शिंदे म्हणाल्या, "कर्जतमध्ये माझं स्वतःचं फार्महाऊस उभारणं हा माझ्या आयुष्यातील सर्वात समाधानकारक अनुभव आहे. शहराच्या गडबडीपासून दूर, शांत आणि प्रसन्न वातावरणात राहावं, अशी माझी इच्छा होती. हळूहळू मी शेतीकडे वळले. काही भाज्या आणि औषधी वनस्पती लावल्या, दररोज रोपांची काळजी घेतली आणि त्यांच्या वाढीचा प्रवास अनुभवला. संयम आणि प्रेमाने रोपं वाढताना पाहणं हे अतिशय समाधान देणारं आहे." त्या पुढे म्हणाल्या, "निसर्गाच्या सान्निध्यात राहणं, पहाटे उठून ताज्या हवेत फेरफटका मारणं, मातीत काम करणं. या सगळ्यातून मला जी शांतता आणि आनंद मिळतो, तो शहरात कधीच मिळू शकत नाही. शहरात ऊर्जा आणि संधी असतात, पण त्याचबरोबर तणाव आणि गोंगाटही असतो. इथे मात्र जीवन अधिक खरं, अधिक संतुलित आणि प्रसन्न वाटतं."

शिल्पांसाठी हे फार्महाऊस केवळ विश्रांतीचं ठिकाण नाही, तर एक कम्फर्ट झोन, जीवन शिकवणारा गुरू आणि आत्मिक समाधान देणारं आश्रयस्थान ठरलं आहे. रोपांची वाढ पाहताना त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही अधिक सकारात्मक आणि कृतज्ञतेचा झाला आहे.

दरम्यान, प्रेक्षकांना शिल्पा शिंदे यांना अंगूरी भाबीच्या भूमिकेत पाहता येणार आहे भाबीजी घर पर है २.० या मालिकेत, दररोज रात्री १०.३० वाजता AND TV वर. तसेच मालिकेचे सर्व भाग कधीही पाहता येतील ZEE5 या डिजिटल प्लॅटफॉर्मवर.

# एण्ड टीव्हीवर हॉरर, कॉमेडी आणि गोंधळाचा महाधमाका!

**(समर्थ गांवकरी)**

प्रेक्षकांच्या आवडत्या एण्ड टीव्ही वाहिनीवर येणाऱ्या 'घरवाली पेडवाली', 'हप्पु की उलटन पलटन' आणि 'भाबीजी घर पर है २.०' या लोकप्रिय मालिकांमधील आगामी भाग प्रेक्षकांना हास्य, सस्पेन्स आणि हॉररचा भन्नाट अनुभव देण्यासाठी सज्ज झाले आहेत. भूतांचा थरार, नात्यांमधील गुंतागुंत, गैरसमज आणि जबरदस्त ट्विस्ट्समुळे हा आठवडा मनोरंजनाने भरलेला असणार आहे.

'घरवाली पेडवाली': प्रेम, मत्सर आणि भुतांचा गोंधळ

'घरवाली पेडवाली' मध्ये लुप्त आत्मा, धक्कादायक उलगडे आणि गुंतागुंतीच्या नातेसंबंधांमुळे जीतूच्या आयुष्यातील गोंधळ अधिक वाढतो. अचानक लट्टू आणि लतिका कुटुंबीयांना दिसू लागतात, ज्यामुळे कथानकाला वेगळीच कलाटणी मिळते. दरम्यान, सावीचा वाढदिवस, जीतू-सावीमधील



रोमँटिक क्षण, लतिकाचा वाढता मत्सर आणि भूतबाधेचे भयावह प्रसंग मालिकेतील थरार अधिक तीव्र करतात. कुलदेवी मंदिराची योजना, गंगाजलाचा वापर आणि धक्कादायक रहस्ये उघड होण्याच्या उंबरठ्यावर आलेले सत्य—या साऱ्यामुळे पुढील भागांमध्ये जबरदस्त ड्रामा पाहायला मिळणार आहे.

'हप्पू की उलटन पलटन': घरगुती भांडणातून महाभूकंप

'हप्पू की उलटन पलटन' मध्ये राजेश आणि हप्पू यांच्यातील वाद इतका वाढतो की विभक्त होण्याची वेळ येते. राजेश घर सोडते, कुटुंब हादरते आणि हप्पू मिळालेल्या स्वातंत्र्याचा आनंद घेत असल्याचे भासवतो. मात्र, मत्सर, खोट्या पार्टी गेस्ट्स, वेषांतर, अधिकाराचा गैरवापर आणि अटकेपर्यंत गेलेली गोष्ट यामुळे परिस्थिती अधिक बिघडते. अखेर वडिलांच्या सुटकेसाठी राजेशला हप्पूकडे विनवणी करावी लागते—हा भावनिक टप्पा प्रेक्षकांना खिळवून ठेवणार आहे.

'भाबीजी घर पर है २.०': विनोदी हॉररचा शिखरबिंदू

'भाबीजी घर पर है २.०' मध्ये हवेलीतील हॉरर अधिक गडद होत जातो. पाहुण्याचे संरक्षण, पियानोवर अवलंबून असलेली सुरक्षा व्यवस्था आणि भूतनी भाबीजीचा वाढता धोका यामुळे तणाव शिगेला पोहोचतो. पियानो बंद पडणे, विभुतीला झालेली दुखापत, अदृश्य शक्तीचा हल्ला आणि भूतनीचे पैंजण—या साऱ्यांमुळे मोठ्या संकटाची चाहूल लागते. विनोद आणि भय यांचा भन्नाट संगम प्रेक्षकांना खळखळून हसवतानाच थरकाप उडवणार आहे.

## जागतिक पातळीवर झेप

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

धोरणात्मक सुधारणा, वाढती गुंतवणूक आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वेगाने होत असलेला अवलंब यामुळे भारतातील ऑटोमोटिव्ह आफ्टरमार्केट आणि ऑटो कॉम्पोनन्ट उद्योग विकासाच्या नव्या टप्प्यात प्रवेश करत आहे. ऑटोमोटिव्ह कॉम्पोनन्ट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडिया (ACMA) च्या माहितीनुसार, आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ऑटो कॉम्पोनन्ट उद्योगाचा महसूल ८०.२ अब्ज अमेरिकी डॉलर्स इतका असून, ऑटोमोटिव्ह आफ्टरमार्केट उद्योगाचा महसूल ११.८ अब्ज अमेरिकी डॉलर्स आहे. २०३० पर्यंत कॉम्पोनन्ट उद्योगाचा महसूल १११ ते २०० अब्ज अमेरिकी डॉलर्सपर्यंत वाढण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. स्थानिकीकरणाला मिळणारे प्रोत्साहन आणि वाढत्या निर्यात संधींमुळे भारतातील ऑटो कॉम्पोनन्ट आणि आफ्टरमार्केट उद्योग जागतिक आफ्टरमार्केट परिसंस्थेमध्ये विश्वासार्ह आणि स्पर्धात्मक भागीदार म्हणून उदयास येत आहेत.

## योगेश त्रिपाठी यांनी सांगितला अभिनयाच्या प्रवासाला कलाटणी देणारा अनपेक्षित निर्णय

**(समर्थ गांवकरी)**

अॅण्ड टीव्हीवरील लोकप्रिय मालिका हप्पू की उलटन पलटन मधील दरोगा हप्पू सिंगची भूमिका साकारणारे योगेश त्रिपाठी आज त्यांच्या आगळ्यावेगळ्या विनोदी शैलीसाठी आणि प्रभावी अभिनयासाठी घराघरात ओळखले जातात. मात्र, या यशस्वी प्रवासामागे एक धाडसी निर्णय, मोठा संघर्ष आणि भावनिक चढउतारांची कहाणी दडलेली आहे.

शिक्षणाला सर्वोच्च महत्त्व देणाऱ्या कुटुंबात वाढलेल्या योगेश यांच्याकडून सर्वांची अपेक्षा होती की त्यांनी सुरक्षित आणि पारंपरिक करिअरची वाट निवडावी. मात्र अभिनय क्षेत्रात काहीतरी वेगळे करण्याच्या तीव्र इच्छेने प्रेरित होऊन त्यांनी आयुष्यातील एक मोठा आणि अनपेक्षित निर्णय घेतला—जो त्यांच्या संपूर्ण जीवनाला कलाटणी देणारा ठरला.



या प्रवासाविषयी बोलताना योगेश त्रिपाठी म्हणाले, "मी अशा कुटुंबातून आलो आहे, जिथे शिक्षण आणि सुरक्षित करिअरला फार महत्त्व दिले जात होते. अभिनय क्षेत्रात जायचे आहे, हे सांगण्याइतके धाडस त्या वेळी माझ्यात नव्हते. म्हणूनच मी वडिलांना रेल्वेची परीक्षा देण्यासाठी जात असल्याचे खोटे सांगितले. मला माहीत होते की खरे सांगितले तर त्यांची चिंता वाढेल. मुंबईला आल्यानंतर आयुष्य अत्यंत आव्हानात्मक होते. छोट्या-मोठ्या नोकऱ्या केल्या, आर्थिक अडचणी आल्या आणि अनेकदा स्वतःच्या निर्णयावरच शंका घेतली. पण मनाच्या कुठेतरी कोपऱ्यात विश्वास होता की माझे स्वप्न पूर्ण होईल."

ते पुढे म्हणाले, "लहानपणी मला धावणाऱ्या ट्रेनचे, विशेषतः मुंबईकडे जाणाऱ्या ट्रेनचे खूप आकर्षण होते. मुंबई मला कायमच न थांबणाऱ्या स्वप्ननगरीसारखी वाटायची. ट्रेनला हात लावून मी नेहमी एक इच्छा करायचो—कधीतरी मी या ट्रेनमध्ये बसून मुंबईला जाईन. अनेक वर्षांनंतर जेव्हा मी ट्रेनने मुंबईला आलो, तेव्हा वाटले की आयुष्यातील एक वर्तुळ पूर्ण झाले आहे."

योगेश यांनी पुढे सांगितले की, जेव्हा त्यांच्या वडिलांना सत्य कळले, तेव्हा ते खूप दुखावले गेले आणि अनेक महिने त्यांनी त्यांच्याशी संवाद साधला नाही.

## अर्धापुरात तहसीलदार यांच्या गाडीला ट्रॅक्टरची धडक तीन जण जखमी



**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

तहसीलदार रेणुकादास देवणीकर हे नांदेडहून तहसील कार्यालय अर्धापूर कडे येत असताना शहरातील वनविभागाच्या कार्यालयासमोर नांदेड कडे जाणाऱ्या ट्रॅक्टरने अचानक तहसीलदार यांच्या गाडी समोर आल्याने ट्रॅक्टर व गाडीची जोरदार धडक झाली तहसीलदार यांच्या गाडीच्या एअरबॅक खुलल्याने गाडीत प्रवास करणारे तहसीलदार रेणुकादास देवणीकर, चालक अरुण वाघमारे,सेवक शेख सलीम हे बाल बाल बचावले असून हा अपघात एवढा जबरदस्त होता की नांदेड कडे जाणारे ट्रॅक्टर अचानकपणे हिंगोली रस्त्यावर आल्याने हा अपघात झाला आहे. या अपघातातील जखमींवर प्राथमिक उपचार ग्राम रुग्णालय अर्धापूर येथे करून पुढील उपचारासाठी नांदेड येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती दिली आहे.

# अजितदादा पवार यांना सर्वपक्षीय शोकसभेत साश्रू नयनांनी वाहीली श्रद्धांजली

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाने संपुर्ण राज्यावर शोककळा पसरली असून या दुःखद घटनेच्या पाश्र्वभूमीवर जामखेडमध्ये दि ३० जानेवारी रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहाजी (काका) राळेभात यांच्या वतीने सर्वपक्षीय शोकसभा आयोजित करण्यात आली होती.

शोकसभेदरम्यान शोक व्यक्त करताना आनेकांनी आपले अनुभव व आठवणी व्यक्त केल्या. यादरम्यान अनेकांना आपले आश्रु अनावर झाले.



तहसील कार्यालयासमोर झालेल्या शोक सभेतला जेष्ठ नेते प्रा. मधुकर (आबा) राळेभात, नगराध्यक्षा प्रांजलताई अमित चिंतामणी, उपनगराध्यक्ष पोपट राळेभात, शहाजी (काका) राळेभात, डॉ भास्कर मोरे, नगरसेवक महेश निमोणकर, अवदुत पवार, वसीम शेख, प्रविण चोरडिया, तात्याराम पोकळे, प्रशांत राळेभात, प्रा विकी घायतडक, पवन राळेभात, राजेंद्र गोरे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर, सुर्यकांत मोरे, बबन (काका) काशीद, भाजपा तालुकाध्यक्ष बापुराव ढवळे, डॉ भगवान मुरुमकर, राजेंद्र पवार, सुरेश भोसले, संभाजी राळेभात, सुनिल जगताप, संजय वराट, ,बीलाल शेख, अमोल गिरमे, प्रकाश काळे, इस्माईल सय्यद, मंगेश (दादा) आजबे, विभाग प्रमुख पांडुरंग माने, हरिभाऊ आजबे, शिवसेनेचे नेते आकाश बाफना, विनायक राऊत, शामीरभाई सय्यद, कॉंग्रेसचे राहुल उगले, शहाजीराजे भोसले, मनसेचे प्रदिप टापरे, आम आदमी पार्टीचे तालुकाध्यक्ष संतोष नवलाखा, दत्तात्रय वारे, बाजीराव गोपाळघरे, जमीरभाई सय्यद, स्वप्रिल खाडे, जितेंद्र बोरा, बापुसाहेब शिंदे, गणेश काळे, गणेश हगवणे, जयसिंग उगले, प्रा. लक्ष्मण ढेपे, वैजीनाथ पोले, राष्ट्रवादी कॉंग्रेस माजी तालुकाध्यक्ष अंजलीताई ढेपे, नगरसेविका नंदाताई होळकर, आशाताई घायतडक, सुरेखा सदाफुले या मान्यवरांसह नागरिक मोठय़ा संख्येने उपस्थित होते.

राज्याचे महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा दादा पवार हे केवळ राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते नव्हते तर ते संपूर्ण महाराष्ट्रातील गोरगरीब वंचित व बहुजन समाजाचे एक जानते नेतृत्व होते त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणात जी पोकळी निर्माण झाली आहे ती कधीही भरून न निघणारी आहे. राज्याचे महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा यांनी महाराष्ट्राला घडवण्याचे व योग्य पद्धतीने नवी दिशा देण्याचे काम केले शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारधारा पुढे ठेवून काम करणारे जे नेते राज्यात होऊन गेले. त्यात सर्वात वरचा नंबर अजित दादा पवार यांचा लागतो. येणाऱ्या काळातही त्यांचे सहकारी व परिवाराच्या माध्यमातून दादांच्या विचारातून महाराष्ट्राला पुढे घेऊन जाण्याचे काम व्हावे.

हिच खरी अजितदादा पवार यांना श्रद्धांजली ठरेल. असे प्रतिपादन शोकसभेचे आयोजक व माजी जिल्हा परिषद सदस्य शहाजी राळेभात यांनी केले.

यावेळी बोलताना भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात म्हणाले की, महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित (दादा) पवार यांना संपूर्ण महाराष्ट्र अजितदादा याच नावाने ओळखायचा असे दादा तुमच्या आमच्यातून निघून गेले आहेत यावर विश्वास बसत नाही. ज्यांनी महाराष्ट्राचं व पवार कुटुंबाचे नाव या देशात उज्वल केलं, दादांनी सहकारातून आपल्या कामाला सुरुवात केली होती, मात्र सार्वजनिक राजकारणात एक मोठा माणूस म्हणून संपूर्ण देश त्यांच्याकडे पाहत होता. त्यांच्या जाण्याने संपूर्ण महाराष्ट्र एकादृष्टीने पोरका झाला आहे.

शोकसभेत अनेकांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की. महाराष्ट्रातील सकारात्मक विचार असलेले नेतृत्व शासन, प्रशासनावर आदपुर्वुक सक्षम पकड असलेले नेतृत्व, सर्व सामान्यांशी नाळ जोडणारे नेतृत्व, समाजातील सर्व घटकांना न्याय देणारे नेतृत्व, आठरपगड समाजाला बरोबर घेणारे नेतृत्व, शिव शाहु फुले आंबेडकर यांच्या विचाराशी बांधिलकी असणारे नेतृत्व हरपले आहे.

# अजितदादा पवार यांना शोकसभेत साश्रू नयनांनी वाहीली श्रद्धांजली

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाने संपुर्ण राज्यावर शोककळा पसरली असून या दुःखद घटनेच्या पाश्र्वभूमीवर जामखेडमध्ये दि ३० जानेवारी रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहाजी (काका) राळेभात यांच्या वतीने सर्वपक्षीय शोकसभा आयोजित करण्यात आली होती. शोकसभे दरम्यान शोक व्यक्त करताना आनेकांनी आपले अनुभव व आठवणी व्यक्त केल्या. यादरम्यान अनेकांना आपले आश्रु अनावर झाले.




तहसील कार्यालयासमोर झालेल्या शोक सभेतला जेष्ठ नेते प्रा. मधुकर (आबा) राळेभात, नगराध्यक्षा प्रांजलताई अमित चिंतामणी, उपनगराध्यक्ष पोपट राळेभात, शहाजी (काका) राळेभात, डॉ भास्कर मोरे, नगरसेवक महेश निमोणकर, अवदुत पवार, वसीम शेख, प्रविण चोरडिया, तात्याराम पोकळे, प्रशांत राळेभात, प्रा विकी घायतडक, पवन राळेभात, राजेंद्र गोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर, सुर्यकांत मोरे, बबन (काका) काशीद, भाजपा तालुकाध्यक्ष बापुराव ढवळे, डॉ भगवान मुरुमकर, राजेंद्र पवार, सुरेश भोसले, संभाजी राळेभात, सुनिल जगताप, संजय वराट, ,बीलाल शेख, अमोल गिरमे, प्रकाश काळे, इस्माईल सय्यद, मंगेश (दादा) आजबे, विभाग प्रमुख पांडुरंग माने, हरिभाऊ आजबे, शिवसेनेचे नेते आकाश बाफना, विनायक राऊत, शामीरभाई सय्यद, काँग्रेसचे राहुल उगले, शहाजीराजे भोसले, मनसेचे प्रदिप टापरे, आम आदमी पार्टीचे तालुकाध्यक्ष संतोष नवलाखा, दत्तात्रय वारे, बाजीराव गोपाळघरे, जमीरभाई सय्यद, स्वप्रिल खाडे, जितेंद्र बोरा, बापुसाहेब शिंदे, गणेश काळे, गणेश हगवणे, जयसिंग उगले, प्रा. लक्ष्मण ढेपे, वैजीनाथ पोले, राष्ट्रवादी काँग्रेस माजी तालुकाध्यक्ष अंजलीताई ढेपे, नगरसेविका नंदाताई होळकर, आशाताई घायतडक, सुरेखा सदाफुले या मान्यवरांसह नागरिक मोठय़ा संख्येने उपस्थित होते. राज्याचे महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा दादा पवार हे केवळ राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नव्हते तर ते संपूर्ण महाराष्ट्रातील गोरगरीब वंचित व बहुजन समाजाचे एक जानते नेतृत्व होते त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणात जी पोकळी निर्माण झाली आहे ती कधीही भरून न निघणारी आहे. राज्याचे महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा यांनी महाराष्ट्राला घडवण्याचे व योग्य पद्धतीने नवी दिशा देण्याचे काम केले शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारधारा पुढे ठेवून काम करणारे जे नेते राज्यात होऊन गेले. त्यात सर्वात वरचा नंबर अजित दादा पवार यांचा लागतो. येणाऱ्या काळातही त्यांचे सहकारी व परिवाराच्या माध्यमातून दादांच्या विचारातून महाराष्ट्राला पुढे घेऊन जाण्याचे काम व्हावे. हिच खरी अजितदादा पवार यांना श्रद्धांजली ठरेल. असे प्रतिपादन शोकसभेचे आयोजक व माजी जिल्हा परिषद सदस्य शहाजी राळेभात यांनी केले. यावेळी बोलताना भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात म्हणाले की, महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित (दादा) पवार यांना संपूर्ण महाराष्ट्र अजितदादा याच नावाने ओळखायचा असे दादा तुमच्या आमच्यातून निघून गेले आहेत यावर विश्वास बसत नाही. ज्यांनी महाराष्ट्राचं व पवार कुटुंबाचे नाव या देशात उज्वल केलं, दादांनी सहकारातून आपल्या कामाला सुरुवात केली होती, मात्र सार्वजनिक राजकारणात एक मोठा माणूस म्हणून संपूर्ण देश त्यांच्याकडे पाहत होता. त्यांच्या जाण्याने संपूर्ण महाराष्ट्र एकादृष्टीने पोरका झाला आहे. शोकसभेत अनेकांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की. महाराष्ट्रातील सकारात्मक विचार असलेले नेतृत्व शासन, प्रशासनावर आदपुर्वुक सक्षम पकड असलेले नेतृत्व, सर्व सामान्यांशी नाळ जोडणारे नेतृत्व, समाजातील सर्व घटकांना न्याय देणारे नेतृत्व, आठरपगड समाजाला बरोबर घेणारे नेतृत्व, शिव शाहु फुले आंबेडकर यांच्या विचाराशी बांधिलकी असणारे नेतृत्व हरपले आहे. आनेकांनी श्रद्धांजलीपर भावना व्यक्त करतांना आठवणी सांगितल्या. आठवणी व अनुभव सांगतांना अनेक वक्त्यांना भावना अनावर झाल्या होत्या. अनेकांना बोलतांना आश्रु अनावर होत होते. या शोकसभा व श्रध्दांजलीपर कार्यक्रमाचा समारोप पसायदानाने करण्यात आला.

## ‘झेड’ कडून ‘दिलफ्लुएन्सर मूमेंट्स’चे लॉंच

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील अग्रगण्य कंटेंट आणि टेक्नॉलॉजी पॉवरहाउस झी एंटरटेनमेंट एंटरप्राईजेस लिमिटेड (झेड) यांनी आज ‘दिलफ्लुएन्सर मूमेंट्स’ या अभिनव मीडिया सोल्यूशनचे अनावरण केले. मल्टी-स्क्रीन एंगेजमेंटच्या युगात सर्जनशील पद्धतीने लक्ष वेधून घेण्यासाठी डिझाइन करण्यात आलेले हे एक ओम्नी-चॅनल मीडिया फॉर्मट असून, ब्रँड्स आणि प्रेक्षकांमध्ये भावनिक नाते निर्माण करण्यावर याचा भर आहे. भारतीय जाहिरात क्षेत्र झपाट्याने बदलत आहे. माध्यमांची उपलब्धता प्रचंड वाढल्यामुळे कोणत्याही आकाराच्या ब्रँडला सहज जाहिरात करता येत असली, तरी या लोकशाहीकरणातून एक नवे आव्हान निर्माण झाले आहे. लक्ष देण्याची क्षमता (Attention Span) कमी होत असताना आणि कंटेंटचा मारा वाढत असताना, मार्केटर्ससमोर एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो: केवळ दिसण्यापासून खऱ्या अर्थाने लक्षात राहण्यापर्यंतचा प्रवास कसा साधायचा? ब्रँडविषयी जागरूकतेपलीकडे जाऊन, ब्रँडप्रेम आणि कृती कशी निर्माण करायची? ‘दिलफ्लुएन्सर मूमेंट्स’ : कथाकथन, व्यक्तिरेखा आणि व्यावसायिक परिणामांचा संगम या आव्हानाला उत्तर म्हणून ‘झेड’ने सादर केले आहे ‘दिलफ्लुएन्सर मूमेंट्स’. व्यक्तिरेखेला केंद्रस्थानी ठेवणारा, मूमेंट-ड्रिव्हन असा हा नवा मीडिया फॉर्मॅट. पारंपरिक जाहिरातींप्रमाणे ग्राहकांच्या अनुभवात व्यत्यय आणण्याऐवजी, ‘दिलफ्लुएन्सर मूमेंट्स’ ब्रँड्सना प्रेक्षकांना आधीपासूनच आवडणाऱ्या आणि सांस्कृतिकदृष्ट्या जुळणाऱ्या कथानकांमध्ये नैसर्गिकरीत्या गुंफतो.




## चौथ्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेन तर्फे (बीएनसीए) ‘मानवी बांधकाम पर्यावरण आणि त्यापलीकडील पारंपरिक ज्ञान आणि शाश्वत भविष्य’ (बिल्ट एनव्हायरमेंट अ‍ॅण्ड बियॉंड 4.0: फ्रॉम ट्रॅडिशनल विज्डम टू रेझिलियंट फ्यूचर) या मालिकेतील चौथ्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन तीन आणि चार फेब्रूवारी 2026 रोजी ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात येत आहे. ही परिषद बीएनसीएचे प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आली आहे. ते म्हणाले की, या परिषदेच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील व्यावसायिक, संशोधक आणि विद्यार्थ्यांना एकत्र आणून कल्पनांची देवाणघेवाण , ज्ञानाचे आदान प्रदान तसेच मानवी बांधकाम व त्यापलिकडील नव्या दृष्टिकांनांचा अभ्यास करण्याचा उद्देश आहे.

## फिजिक्सवाला कडून सीबीएसई इयत्ता दहावी विद्यार्थ्यांसाठी मोफत शंका निरसन आणि मॉक प्री-बोर्ड परीक्षांचा उपक्रम

**(समर्थ गांवकरी)**

अग्रगण्य शिक्षण कंपनी फिजिक्सवाला (PW) ने संपूर्ण भारतातील सीबीएसई इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत शंका निरसन सहाय्य आणि मॉक प्री-बोर्ड परीक्षांचा विशेष उपक्रम जाहीर केला आहे. २०२६ मध्ये बोर्ड परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रभावी तयारीसाठी आवश्यक मार्गदर्शन आणि तज्ज्ञांचे सहकार्य मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत, पीडब्ल्यूशी नोंदणीकृत असो वा नसो, देशभरातील कोणताही इयत्ता दहावीचा विद्यार्थी मोफत शंका निरसन सेवा घेऊ शकतो. परीक्षेच्या तयारीदरम्यान येणारा ताण कमी करणे आणि विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणे, यासाठी हा उपक्रम खास डिझाइन करण्यात आला आहे. यासोबतच, फिजिक्सवाला विज्ञान आणि गणित विषयांसाठी ऑफलाइन प्री-बोर्ड (मॉक) परीक्षा देखील आयोजित करणार आहे. या परीक्षा पीडब्ल्यूची विद्यापीठे, पाठशाला आणि ट्यूशन सेंटर्स अशा प्रत्यक्ष केंद्रांवर घेतल्या जातील. यामुळे विद्यार्थ्यांना खऱ्या बोर्ड परीक्षेसारखा अनुभव मिळेल, तसेच वेळ व्यवस्थापन, उत्तर लेखन कौशल्य आणि विषयांवरील प्रभुत्व अधिक मजबूत होण्यास मदत होईल. फिजिक्सवाला विद्यापीठ–ऑफलाइनचे सीईओ अंकित गुप्ता म्हणाले, “बोर्ड परीक्षांसारख्या निर्णायक टप्प्यावर विद्यार्थ्यांना कोणत्याही अडथळ्यांशिवाय शिक्षण आणि मार्गदर्शन मिळाले पाहिजे. अनेकदा एका शंकेचे निरसन न झाल्यामुळेही विद्यार्थ्यांवर मोठा ताण येतो. त्यामुळे आमच्याशी नोंदणीकृत असो वा नसो, प्रत्येक विद्यार्थ्याला विद्यापीठ, पाठशाला आणि ट्यूशन सेंटर्सच्या माध्यमातून आवश्यक पाठिंबा देण्याचा आमचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने आणि त्यांच्या संपूर्ण क्षमतेसह उत्तम कामगिरी करावी, हीच आमची महत्त्वाकांक्षा आहे.” या उपक्रमांतर्गत विद्यार्थी त्यांच्या जवळच्या फिजिक्सवाला विद्यापीठ, पाठशाला किंवा ट्यूशन सेंटरला भेट देऊन बोर्ड परीक्षेपर्यंत वैध असलेला ‘डाऊट बस्टर पास’ मिळवू शकतात. तसेच शंका निरसनासाठी स्लॉट बुक करण्याची सुविधाही उपलब्ध आहे. अनुभवी शिक्षकांकडून भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि जीवशास्त्र या विषयांतील शंकांचे सविस्तर स्पष्टीकरण, तसेच उत्तर लेखन तंत्रांबाबत मार्गदर्शन दिले जाईल.

**विद्यार्थी पीडब्ल्यू ॲपच्या माध्यमातून**

– १ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या विज्ञान परीक्षेसाठी आणि
– ८ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या गणित परीक्षेसाठी
त्यांच्या जवळच्या केंद्रावर स्लॉट बुक करू शकतात.
हा उपक्रम ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत भारतातील १३२ शहरांमध्ये कार्यरत असलेल्या फिजिक्सवाला यांच्या १९२ तंत्रज्ञान-सक्षम विद्यापीठ आणि पाठशाला केंद्रांच्या नेटवर्कद्वारे राबवण्यात येत आहे.

## टाटा प्ले बिंजकडून ‘शॉट्स’चे अनावरण; मायक्रो-ड्रामासाठी नवे व्यासपीठ

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

मोबाईलवर कंटेंट पाहण्याची सवय वेगाने बदलत असताना, टाटा प्ले बिंजने ‘शॉट्स’ ही नवी कंटेंट श्रेणी सादर करत आपल्या डिजिटल विश्वाचा विस्तार केला आहे. जगातील पहिला डेस्टिनेशन अ‍ॅग्रीगेटिंग मायक्रो-ड्रामा म्हणून ओळख मिळवणारे ‘शॉट्स’ हे फक्त मोबाईलसाठी डिझाइन केलेले, व्हर्टिकल स्वरूपातील सूक्ष्म नाट्यप्रयोगांचे व्यासपीठ आहे.

‘शॉट्स’ हे सर्व अ‍ॅक्टिव्ह टाटा प्ले बिंज सबस्क्राइबर्ससाठी कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय उपलब्ध असून, जाहिरातींसह चालणारे (Ad-supported) माध्यम आहे. जीवनातील छोट्या-छोट्या क्षणांसाठी तयार केलेल्या १ ते २ मिनिटांच्या भागांमधून हे व्यासपीठ प्रवास, रांगा किंवा लहान ब्रेक्सदरम्यान मनोरंजनाचा नवा अनुभव देण्याचा प्रयत्न करत आहे. लॉंचच्या टप्प्यावर बुलेट आणि स्टेज हे पहिले कंटेंट पार्टनर्स असून, अ‍ॅक्शन, ड्रामा आणि थ्रिलर प्रकारांतील १६० हून अधिक मायक्रो-ड्रामा प्रेक्षकांसाठी उपलब्ध असतील. येत्या काही महिन्यांत आणखी भागीदार या उपक्रमात सहभागी होणार असून, एकूण ११० तासांहून अधिक शॉर्ट-फॉरमॅट कंटेंट प्लॅटफॉर्मवर दाखल होणार आहे. पूर्णतः व्हर्टिकल वापरासाठी तयार केलेल्या ‘शॉट्स’ मध्ये स्क्रॉल-फ्रेंडली इंटरफेस, ऑटो-नेक्स्ट प्लेबॅक आणि स्मार्ट डिस्कव्हरी फीचर्सचा समावेश आहे. टाटा प्ले बिंज अ‍ॅपमध्ये समर्पित होम-पेज रील आणि स्वतंत्र ‘शॉट्स’ विभागाद्वारे हे कंटेंट सहज उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यामुळे अ‍ॅप बदलण्याची किंवा वेगळे सबस्क्रिप्शन घेण्याची गरज उरत नाही. लॉंचवेळी हिंदीसह तमिळ, तेलुगू, बंगाली, मराठी आदी प्रमुख प्रादेशिक भाषांमध्येही मायक्रो-ड्रामा सादर केले जात आहेत. इश्क किल्स, तलाक के लिए कुछ भी करेगा, रेंट ए बॉयफ्रेंड, मैं हूं अपराजिता (हिंदी), वन लास्ट राइड (तेलुगू) तसेच आफत या प्यार, हॉरर हवेली (राजस्थानी) यांसह १२ वी वाला प्यार आणि गौरव की स्वीटी (हरियाणवी) यांसारखी शीर्षके यात समाविष्ट आहेत.




या नव्या उपक्रमाविषयी टाटा प्लेच्या मुख्य कमर्शियल आणि कंटेंट ऑफिसर पल्लवी पुरी म्हणाल्या, “व्हर्टिकल आणि शॉर्ट-फॉर्म कथाकथन हे मोबाईलवर कंटेंट पाहण्याचे प्रमुख माध्यम बनत आहे. प्रेक्षकांच्या बदलत्या सवयी लक्षात घेऊन ‘शॉट्स’ हा एक नैसर्गिक विस्तार आहे. अनेक कंटेंट पार्टनर्सकडील मायक्रो-ड्रामा एकाच ठिकाणी, कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे.” ‘शॉट्स’च्या लॉंचमुळे टाटा प्ले बिंजचे भारतातील सर्वात व्यापक ओटीटी अ‍ॅग्रीगेटर्सपैकी एक म्हणून स्थान अधिक बळकट झाले असून, लॉंग-फॉर्म कंटेंटसोबत शॉर्ट-फॉर्म लेयर जोडत प्रेक्षकांचा दैनंदिन सहभाग वाढवण्यावर भर देण्यात आला आहे.

## पेटीएमने सलग तिसऱ्या तिमाहीत नफा कमावला

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पेटीएम (वन ९७ कम्युनिकेशन्स लिमिटेड), भारतातील एमएसएमई आणि मोठ्या उद्योगांना सेवा देणारी पूर्ण-स्टॅक व्यापारी पेमेंटमधील अग्रणी कंपनी, आणि एक अग्रगण्य वित्तीय सेवा वितरण कंपनी, तसेच मोबाइल पेमेंट, क्यूआर कोड आणि साउंडबॉक्सची प्रणेती, यांनी आज डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीचे (तिसरी तिमाही आर्थिक वर्ष २६) आर्थिक निकाल जाहीर केले. मजबूत मुद्रीकरण, उच्च पेमेंट जीएमव्ही, व्यापारी सबस्क्रिप्शन आणि वित्तीय सेवांच्या वितरणातून मिळणाऱ्या महसुलामुळे कंपनीने सलग तिसऱ्या तिमाहीत नफा नोंदवला आहे. डिसेंबर तिमाहीत, पेटीएमने ₹२२५ कोटींचा कर-पश्चात नफा (PAT) नोंदवला, जो मागील वर्षाच्या तुलनेत ₹४३३ कोटींनी अधिक आहे.

## फ्लिपकार्टचा ‘क्राफ्टेड बाय भारत’ सेल प्रजासत्ताक दिनी महिला-नेतृत्वित उद्योग आणि पारंपरिक कारागिरीला देणार विशेष व्यासपीठ

**(समर्थ गांवकरी)**

भारतातील स्वदेशी ई-कॉमर्स मार्केटप्लेस फ्लिपकार्ट ने आपल्या प्रमुख समर्थ विक्री उपक्रम ‘क्राफ्टेड बाय भारत २०२६’ च्या अकराव्या एडिशनची घोषणा केली आहे. भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्याच्या निमित्ताने हा विशेष सेल २६ जानेवारी २०२६ रोजी फ्लिपकार्टच्या अ‍ॅप आणि वेबसाइटवर आयोजित करण्यात येणार आहे.

या सेलसाठी फ्लिपकार्टवर खास ‘क्राफ्टेड बाय भारत’ स्टोअरफ्रंट सादर करण्यात येणार असून, त्यामध्ये वारली, पट्टाचित्र, मधुबनी, पिछवाई, टेराकोटा यांसह २०० हून अधिक पारंपरिक भारतीय कलाप्रकारांचे प्रदर्शन केले जाईल. यासोबतच, मऊ हस्तिदंती लाकडापासून हाताने बनवलेली खेळणी, लाकडी हस्तकला, हातमागावरील वस्त्रे तसेच विविध प्रादेशिक चित्रकला प्रकारांचा समावेश असेल. भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाशी जोडलेले २,३०० हून अधिक कारागीर, विणकर आणि सूक्ष्म उद्योजक या सेलमध्ये आपली उत्पादने सादर करणार आहेत.

२०१९ मध्ये वंचित समुदायांच्या सक्षमीकरणासाठी सुरू करण्यात आलेल्या ‘फ्लिपकार्ट समर्थ’ या प्रमुख उपक्रमाअंतर्गत, ‘क्राफ्टेड बाय भारत’ च्या या एडिशनमध्ये महिला-नेतृत्वित उद्योगांवर विशेष भर देण्यात आला आहे. कन्नौज, भुज, भदोही, हाथरस, हिसार, मदुराई, चित्रकूट, रामनगर, गाझीपूर, उज्जैन, चुरू आणि रतनगड यांसारख्या द्वितीय व तृतीय श्रेणीतील शहरांमधील महिला उद्योजकांना या व्यासपीठावर प्रकाशझोतात आणले जाणार आहे. या माध्यमातून भारतीय कारागिरीच्या समृद्ध परंपरेचा उत्सव साजरा केला जाईल. या उपक्रमात सरकारी व खासगी ब्रँड्ससह देशभरातील स्थानिक उद्योजकांचा सक्रिय सहभाग असणार असून, त्याचा १.९ दशलक्षहून अधिक व्यक्तींच्या उपजीविकेवर सकारात्मक परिणाम होण्याची अपेक्षा आहे. यंदा ३०० हून अधिक नवीन विक्रेत्यांच्या समावेशामुळे ग्राहकांना फर्निचर, फर्निशिंग, होम डेकोर, किचनवेअर, अ‍ॅपरल आणि लाइफस्टाइल अशा विविध श्रेणींमध्ये भारताच्या कानाकोपऱ्यातील कारागिरांकडून तयार झालेली उत्पादने उपलब्ध होतील. एमएसएमई आणि कारागिरांना ई-कॉमर्सच्या माध्यमातून दीर्घकालीन डिजिटल व्यवसाय उभारण्यासाठी सक्षम करण्याच्या फ्लिपकार्टच्या धोरणाशी सुसंगत असलेले ‘क्राफ्टेड बाय भारत’ चे हे प्रजासत्ताक दिन विशेष एडिशन, विक्रेत्यांना संपूर्ण भारतातील ग्राहकांशी जोडण्याची संधी देईल.

## झी सिनेमावर ‘तेहरान’ चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

रोमहर्षक कथा, दमदार अ‍ॅक्शन आणि थरारक गतीसह झी सिनेमावर ‘तेहरान’ या चित्रपटाचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर शनिवार, 31 जानेवारी रोजी 1 वाजता होणार आहे. या चित्रपटात जॉन अब्राहमने त्याच्या सर्वात प्रभावी आणि ताकदीच्या भूमिकांपैकी एक असलेली भूमिका साकारली आहे. हृदयाची धडधड वाढवणाऱ्या अ‍ॅक्शन आणि उत्कंठावर्धक थराराने भरलेल्या या चित्रपटात एका भीषण बॉम्बस्फोटामागील दहशतवाद्यांचा शोध घेताना जॉन अब्राहम वेळेसोबत स्पर्धा करताना दिसतो, ज्यामुळे प्रेक्षक सुरुवातीपासून शेवटपर्यंत या चित्रपटाला खिळून राहतात. अरुण गोपालन दिग्दर्शित या चित्रपटात जॉन अब्राहमसोबत मनुषी छिल्लर आणि नीरू बाजवा यांसारख्या कलाकारांचा समावेश आहे. त्यांच्या दमदार अभिनयामुळे कथेला अधिक खोली मिळते आणि चित्रपट अधिक रोचक बनतो. जॉन अब्राहमने यात एसीपी राजीव कुमारची भूमिका साकारली आहे, जो परदेशी अधिकाऱ्यांना लक्ष्य करणाऱ्या दिल्लीतील भीषण बॉम्बस्फोटानंतर एका गुप्त मोहिमेवर निघतो. सुरुवातीला हल्ल्यामागील लोकांचा शोध घेण्याची मोहीम सुरू होते, पण लवकरच तो गुपित असलेले अजेंडे, बदलणारी निष्ठा आणि सीमापार कार्यरत असलेल्या गूढ शक्तींच्या जाळ्यात अडकतो.




## क्रॉम्प्टनचा झेंडा; जगातील क्रमांक एकचा सिलिंग फॅन ब्रॅंड म्हणून गौरव

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारताच्या अभियांत्रिकी कौशल्याचा आणि नाविन्यपूर्ण उत्पादनांचा जागतिक स्तरावर गौरव करणारी कामगिरी करत, क्रॉम्प्टन या प्रतिष्ठित भारतीय ग्राहक ब्रॅंडला जगातील पहिल्या क्रमांकाचा सिलिंग फॅन ब्रॅंड म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. जागतिक आघाडीची स्वतंत्र बाजारसंशोधन संस्था युरोमॉनिटर इंटरनॅशनलने ही मान्यता दिली आहे. या गौरवामुळे क्रॉम्प्टनचा समावेश अशा निवडक भारतीय ब्रॅंड्समध्ये झाला आहे, ज्यांनी केवळ देशांतर्गतच नव्हे तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतही गुणवत्ता, कार्यक्षमता आणि डिझाइनचे नवे मापदंड प्रस्थापित केले आहेत. ८५ वर्षांहून अधिक गौरवशाली परंपरेसह क्रॉम्प्टनचा प्रवास भारतीय नाविन्यतेची उत्क्रांती अधोरेखित करतो. लाखो घरांमध्ये विश्वासार्हता निर्माण करत, ब्रॅंडने कार्यक्षमता, ऊर्जा बचत आणि आधुनिक डिझाइनमध्ये जागतिक दर्जा गाठला आहे. भारतातील अभियांत्रिकी उत्कृष्टता, मजबूत उत्पादन क्षमता आणि ग्राहकांच्या दैनंदिन गरजांची सखोल समज यामुळे क्रॉम्प्टनची जागतिक लोकप्रियता सातत्याने वाढत आहे.




या ऐतिहासिक यशाबद्दल प्रतिक्रिया देताना क्रॉम्प्टनचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी प्रोमीत घोष म्हणाले, “भारताच्या अनेक पिढ्यांचा विश्वास संपादन केलेल्या क्रॉम्प्टनला जगातील क्रमांक एकचा सिलिंग फॅन ब्रॅंड म्हणून ओळख मिळणे, हा आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. या टप्प्यामुळे आमच्या भूतकाळातील वारशासोबतच ‘क्रॉम्प्टन २.०’ या भविष्याभिमुख प्रवासातील आमची संशोधन, विकास आणि प्रगत तंत्रज्ञानातील गुंतवणूक अधोरेखित होते. ‘मेक इन इंडिया’ च्या बळकटीसह जागतिक उपस्थिती वाढवण्याचा आमचा निर्धार अधिक दृढ झाला आहे.”

ते पुढे म्हणाले, “एक्स-टेक आणि न्यूक्लिअस हे आमचे नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म्स पुढील पिढीच्या फॅन तंत्रज्ञानाला दिशा देत आहेत. भविष्यासाठी सज्ज, लवचिक आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक डिझाइन तयार करण्यावर आमचा भर असून, क्रॉम्प्टन केवळ बदल स्वीकारत नाही तर संपूर्ण श्रेणीचे भविष्य नव्या उंचीवर नेतो.” दरवर्षी दोन कोटींहून अधिक पंख्यांची विक्री आणि दर दोन सेकंदाला एक क्रॉम्प्टन पंखा खरेदी होणे, हा ब्रॅंडवरील ग्राहकांच्या दृढ विश्वासाचा प्रत्यय आहे. २०० हून अधिक तज्ज्ञांची आरअँडडी टीम आणि १०० कोटी रुपयांहून अधिक वार्षिक गुंतवणुकीच्या माध्यमातून क्रॉम्प्टनने अँटी-डस्ट तंत्रज्ञान, एअर ३६०० एअरफ्लो आणि सायलेंटप्रो यांसारखी अत्याधुनिक नवकल्पना सादर केल्या आहेत. डिझाइन आणि कार्यक्षमतेतील उत्कृष्टतेसाठी क्रॉम्प्टनला आंतरराष्ट्रीय स्तरावरही सन्मान मिळाला असून, सायलेंटप्रो ब्लॉसम स्मार्ट फॅनसाठी गुड डिझाइन अवॉर्ड जपान २०२४, सायलेंटप्रो फ्लुइडो वेव्हसाठी रेड डॉट डिझाइन अवॉर्ड २०२५ आणि जर्मन डिझाइन अवॉर्ड २०२६ प्राप्त झाले आहेत. क्रॉम्प्टन अर्थपूर्ण नाविन्यतेच्या माध्यमातून दैनंदिन जीवन अधिक सुलभ व आनंददायी बनवण्याच्या उद्देशाशी कटिबद्ध असून, तंत्रज्ञान, विश्वास आणि दूरदृष्टीच्या बळावर जागतिक मंचावर भारताचे अभिमानाने प्रतिनिधित्व करत आहे. ही मान्यता युरोमॉनिटर इंटरनॅशनलच्या व्यापक आणि सखोल संशोधनावर आधारित असून, २०२४ या कॅलेंडर वर्षातील जागतिक रिटेल युनिट विक्रीच्या आधारे, विविध देशांतील सिलिंग फॅन ब्रॅंड्सचे मूल्यमापन करण्यात आले आहे.